। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २५१ वा । मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ । पृष्ठ ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## छ.संभाजीनगरात भाजपात तिकिटावरुन स्फोट!

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शहरात जोरदार राजकीय नाट्य रंगताना पाहायला मिळाले. उमेदवारी न मिळालेल्या दिव्या मराठे या महिलेने भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याने भाजपच्या कार्यालयाबाहेरच अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. मंगळवारी महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

त्यामुळे भाजपच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाबाहेर एबी फॉर्म घेण्यासाठी इच्छूकांनी प्रचंड गर्दी केली होती. यावेळी काही जणांना पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. तेव्हा दिव्या मराठे या उमेदवारी नाकारण्यात आलेल्या इच्छूक उमेदवार आणि काही कार्यकर्त्यांनी अतुल सावे आणि भागवंत कराडांच्या केबिनचा दरवाजा तोडून आत शिरण्याचा प्रयत्न केला. तसेच या महिलेने बाटलीतून पेट्रोल



आणले होते. तिने हे पेट्रोल अंगावर ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तिला वेळीच पकडल्याने पुढील अनर्थ टळला. दिव्या मराठे यांच्यासह भाजपमधील अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. यापैकी काही जणांनी निवडणूक लढवण्यासाठी नोकरी सोडली होती. मात्र, ऐनवेळी पक्षाने उमेदवार बदलला, असे भाजपच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

दिव्या मराठे या इच्छूक महिला उमेदवाराने भाजपच्या स्थानिक नेतृत्त्वावर गंभीर आरोप केले. मी पक्षासाठी १५ केसेस अंगावर घेतल्या. मी नगरसेवक असताना माझ्या प्रभागात प्रचंड विकास केला. तरीही भाजपने मला उमेदवारी दिली नाही. मागच्यावेळी सुध्दा माझं नाव होत सर्व्हेत, तरीही मला तिकीट नाकारले होते. मी गेल्या १८ वर्षांपासून पक्षात काम करत आहे. मी अतुल सावे यांना याचा जाब विचारणार आहे, असे या महिलेने म्हटले.

प्रभाग २० मधील इच्छूक उमेदवार दिव्या उल्हास मराठे यांनी तिकीट नाकारल्याने आज भाजपच्या प्रचार कार्यालयात नेत्यांना अक्षरशः धारेवर धरले. आम्ही पक्षाशी एकनिष्ठ होतो. मला उमेदवारी मिळायला पाहिजे होती. जेव्हा पक्ष कठीण काळात होता, तेव्हा माझी मुले लहान असतानाही मी घरादाराचा विचार न करता पक्षाचे काम केले. आज पक्ष एक नंबरवर आल्यावर आम्हा जुन्या कार्यकर्त्यांना डावलले जात आहे. नेत्यांच्या बायका एसीमध्ये बसतात आणि कार्यकर्त्या महिलांनी मात्र रस्त्यावर उतरून संघर्ष करायचा का, असा सवाल दिव्या मराठे यांनी विचारला.

## चीनची आक्रमक हालचाल, तैवानला सैन्याने वेढा घातला



**तैवान/वृत्तसंस्था:** आधीच रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. हे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, आता आणखी दोन देशांमध्ये युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे. आता चीनने तापमान वाढवले आहे, यामुळे जगाला युद्धाची भीती निर्माण झाली आहे. चीनने तैवानच्या सीमावर्ती भागाजवळ मोठ्या प्रमाणात आपले तीनही सशस्त्र दल - जमीन, समुद्र आणि हवाई - तैवानच्या सीमेजवळ तैनात केले आहेत. शिवाय, तैवानच्या सीमेवर लष्करी सराव केले जात आहेत, यामध्ये हवाई दलाचा समावेश आहे. विमानांचे उड्डाणही थांबवण्यात आले आहेत. चीनच्या कृतींमुळे मोठ्या संख्येने उड्डाणे रद्द केली जात आहेत, यामुळे जगभरातील अंदाजे १००,००० प्रवाशांवर परिणाम होत आहे.

काही दिवसांपूर्वी अमेरिकेने तैवानला ११ अब्ज डॉलर्सपर्यंतची शस्त्रे पुरवण्यास मान्यता दिली आहे. यामुळे चीन संतप्त झाला आहे, तो वन चायना योजनेअंतर्गत तैवानला आपल्या भूभागाचा भाग मानतो. या परिस्थितीत, त्यांनी अमेरिकेच्या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. शिवाय, जपानचे पंतप्रधान साने ताकाची यांनी जर चीनने तैवान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर आमचे सैन्य देखील युद्धात सामील होईल, असे सांगितले होते.

जपानच्या या विधानामुळे चीन आणखी संतापला आहे. तैवानला त्यांच्या अधिपत्याखाली येण्याची हीच योग्य वेळ आहे, असे चीनच्या नेतृत्वाने म्हटले आहे. सोमवारी जारी केलेल्या निवेदनात चीनने अमेरिका किंवा जपानचा उल्लेख केला नाही. अमेरिकेच्या पाठिंब्याने तैवान स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. दरम्यान, तैवान कोणत्याही परिस्थितीसाठी तयार असल्याचे सांगत आहे आणि त्यांनी आपल्या सुरक्षा दलांना सतर्क ठेवले आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने असे म्हटले आहे.

## बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांचे निधन

ढाका : बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान आणि 'बांगलादेश नॅशनल पार्टी'च्या (इछ्झ) सर्वेसर्वा खालिदा झिया यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या जाण्याने दक्षिण आशियाई राजकारणातील एका संघर्षाच्या कालखंडाचा अंत झाला आहे. खालिदा झिया म्हणजे केवळ सत्ता आणि राजकारण नव्हतं, तर त्यांचं व्यक्तिमत्त्व एका विशिष्ट 'स्टाईल'साठी ओळखलं जायचं. विशेष म्हणजे, त्यांची फॅशन कधीही ग्लॅमरसाठी नव्हती, तर तो त्यांच्या राजकीय भूमिकेचा आणि मानसिक शक्तीचा एक अविभाज्य भाग होता.



खालिदा झिया यांच्या साड्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्या नेहमी सुती किंवा रेशमी साड्यांना पसंती देत. पांढरा, क्रीम, फिकट गुलाबी, आणि आकाशी निळा यांसारख्या शांत रंगांच्या साड्या परिधान करून त्यांनी आपला साधेपणा जपला. दिखाऊपणा टाळून त्यांनी नेहमीच आपण सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करतो, हेच आपल्या वेशभूषेतून दाखवून दिले. विशेषतः काळ्या काठची पांढरी साडी त्यांच्या संघर्षाचे आणि शोकाचे प्रतीक मानली जायची, ज्याने समर्थकांमध्ये एक भावनिक नाते निर्माण केले.

खालिदा झिया यांची सर्वात ठळक ओळख म्हणजे त्यांचे मोठे काळे सनग्लासेस. कोणत्याही सार्वजनिक सभेत, निदर्शनांत किंवा न्यायालयीन हजेरीच्या वेळी हा चष्मा त्यांच्या चेहऱ्यावर असायचा. हा केवळ डोळ्यांचे रक्षण करण्याचा मार्ग नव्हता, तर ते त्यांच्या निडर आणि गूढ व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक बनले. कॅमेऱ्यांची नजर नेहमीच त्यांच्या या सनग्लासेसवर खिळलेली असायची. कोणत्याही ब्रँडचा प्रचार न करता त्यांनी या साध्या वाटणाऱ्या चष्म्यातून एक कणखर राजकीय संदेश दिला.

### भावपूर्ण श्रद्धांजली



कै.रमेश विरभद्रआप्पा हळीखेडे (महाराज)

शोकाकुल परिवार.
मुद्रण व वृत्तपत्र चालक
लातूर

## श्रीमती श्वेता नागणे मनपा यांच्या हस्ते दयानंद कलात संकल्प पत्राचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयात ईएलसी च्या वतीने मतदार जागरूकता व सहभाग कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले होते.मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूक व सक्रीय सहभाग वाढावा, यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या स्वीप उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम बविण्यात आला.

या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी (मनपा) तथा स्वीपच्या नोडल अधिकारी श्रीमती श्वेता नागणे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्वीप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदान प्रक्रियेविषयी जनजागृती करणे, मतदान प्रक्रियेचे सखोल ज्ञान प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवणे तसेच सामान्य मतदारांचा सहभाग वाढवून लोकशाहीला खऱ्या अर्थाने लोकसहभागात्मक बनविणे हा आहे. याच अनुषंगाने लातूर महानगरपालिका निवडणुक २०२६ च्या निमित्ताने शहरभर शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून विविध मतदान जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.

त्यांनी विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीपर मार्गदर्शन करताना सांगितले की, आधुनिक काळात अनेक मतदार मतदानासाठी घराबाहेर पडत नाहीत, त्यामुळे मतदानाची टक्केवारी लक्षणीयरीत्या घटत चालली आहे. ही बाब लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. प्रत्येक तरुण मतदाराने स्वतः मतदान करणे तर



आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर इतर नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तरुणांनी या जबाबदारीची जाणीव ठेवून मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

तसेच विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीसाठी संकल्पपत्राचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमात विस्तार अधिकारी श्री मधुकर ढमाले, श्री सतीश भापकर, श्री सतीश चव्हाण, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. मच्छिंद्र खंडागळे, प्रा जिगाजी बुद्रुके, प्रा. महेश जंगापल्ले व विद्यार्थी उपस्थित होते.

## रमेश हळीखेडे यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील वृत्तपत्रासाठी लागणारा कागद आणि लग्नपत्रिकेच्या कागदाचे व्यापारी रमेश विरभद्रअप्पा हळीखेडे महाराज यांचे सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा साई विहार खाडगाव येथून निघाली होती. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



दिवंगत रमेश हळीखेडे यांच्या पश्चात पत्नी, योगेश हा मुलगा, सुन, दोन विवाहित मुली असा परिवार आहे. मंगळवार दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी त्यांच्या पार्थीव देहावर खाडगाव स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**चीनने तैवानला पाचही बाजूने घेरले...**

## तरुणाची अनसरवाडा येथे मामाच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या

**लातूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील सिंदखेड येथील एका २५ वर्षीय तरुणाने मामाच्या शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (२९ डिसेंबर) सकाळी उघडकीस आली. विष्णू वसंत जंगलबोने (वय २५, रा. सिंदखेड) असे मृत तरुणाचे नाव आहे.

विष्णू हा सिंदखेड येथे आपल्या आई-वडिलांसोबत राहत होता. सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास अनसरवाडा येथील त्याचे मामा दत्तात्रय वाघमारे हे जनावरांचे दूध काढण्यासाठी शेतात गेले होते. यावेळी त्यांना चिंचेच्या झाडाला कोणीतरी लटकलेले दिसले. जवळ जाऊन पाहिले असता त्यांचा भाच्चा विष्णू याने पांढऱ्या सुती दोरीने गळफास घेतल्याचे स्पष्ट झाले. मयत विष्णूचे मामा दत्तात्रय वाघमारे हे दररोजप्रमाणे सकाळी ७ वाजता शेतात गेले असता त्यांना हा प्रकार दिसून आला. आपल्याच भाच्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे पाहून त्यांना मोठा धक्का बसला. भरुदवंडीत घडलेल्या या घटनेमुळे सिंदखेड आणि अनसरवाडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलीस आता या तरुणाच्या नेमक्या कारणांचा शोध घेत आहेत.

### चिमटा दयाचा



लातूर महानगरपालिका सह इतरही ठिकाणी बंडखोरी अटळ आहे ! नेत्याच्या डोकेदुखीत वाढ होणार आहे !!

## मानसिक आरोग्य कायद्याचा लाभ रुग्णांना द्या : न्या. जाधव



**लातूर/प्रतिनिधी :** 'मानसिक आजार ही केवळ वैद्यकीय समस्या नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे. मानसिक आरोग्य कायदा-२०१७ चा लाभ गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवून त्यांचे हक्क जपले पाहिजेत,' असे आवाहन जिल्हा न्यायाधीश एस. व्ही. जाधव यांनी केले.

लातूर जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित मानसिक आरोग्य आढावा मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शीतल तळीखेडकर, अशासकीय सदस्य आर. बी. जोशी, आर. एम. क्षीरसागर आणि डॉ. सुधीर बनशेळकीकर उपस्थित होते. न्या. जाधव म्हणाले, समाजात मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. मंडळाने या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून रुग्णांना न्याय मिळवून द्यावा. यावेळी सदस्य सचिव डॉ. एस. व्ही. ढगे यांनी मंडळाच्या जबाबदाऱ्यांची माहिती दिली.

स्वतंत्र कक्षाची स्थापना

आरोग्य सेवा उपसंचालक कार्यालयात या मंडळासाठी आता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कामासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## आहारात रासायनिक विष कालविणे योग्य नाही

सध्याला जीवन प्रणालीत काय खावे किंवा काय नको. कोणते शुद्ध आहे तर कोणते विषारी आहे हे कळून येत नाही. फळे व भाजीपाला पिकविण्यासाठी रासायनिक पदार्थाचा वापर केला जातो तो आरोग्यास घातक आहे. फळे तर नैसर्गिक पिकविचले जात नाहीत. केळी असो किंवा आंबे हे रासायनिक प्रक्रियाकरून पिकविले जात आहेत. शेतात मोठ्या प्रमाणात युरिया हा मानवाच्या आरोग्यास घातक असलेला खत वापरला जातो. ऊसासाठी उपयुक्त असणारा हा खत जमीनीत मिसळतो तेंव्हा तो विहीरी किंवा विंधन विहीरीच्या पाण्यात मिसळला जातो. तो आरोग्यास घातक आहे. तसे देशातील नागरिक हे सुशिक्षित आहेत. ते अभ्यासू आहेत. त्यामुळे विचार करावा की, आपण अन्न खातो का विष? या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. आता तर नवीनच प्रकाराची माहिती मिळत आहे. सांगली शहर आणि तासगांव मधील काही कोल्ड स्टोरेज मालकांनी चीनचा बेदाणा अफगाणिस्तानमार्गे सांगली जिल्ह्यात आयात केला आहे. बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचा भांडा फोड केला आहे. त्यामुळे देशाअंतर्गत बेदाण्याचे दर पाडण्याचे षडयंत्र सुरु आहे. बेदाणा आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांना बदडून काढू असा इशारा स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्षांनी दिला आहे. अफगाणिस्तानातून तस्करी केलेला बेदाणा थेट तासगाव आणि सांगलीच्या कोल्ड स्टोरेजवर असल्याची माहिती मिळाल्यानंतर द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कोल्ड स्टोरेज आणि वॉशिंग सेंटरवर धाडी टाकल्या. अनेक ठिकाणी अफगाणिस्तानचा बेदाणा आढळून आला. मात्र, वॉशिंग सेंटर आणि कोल्ड स्टोरेज चालकांनी बेदाण्याबाबत अधिक माहिती देण्यास टाळाटाळ केली. तर, मुंबईत बनावट दुधाचा पर्दाफाश झाला आहे. मुंबईकरांच्या आरोग्याशी खेळणारा एक अत्यंत भयानक प्रकार समोर आला आहे. अंधेरी पश्चिम येथील कपासवाडी परिसरात स्थानिक रहिवासी आणि पोलिसांनी छापा टाकून बनावट दूध तयार करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. चक्क डिटर्जंट पावडर, युरिया आणि रिफाईंड तेल वापरून हे पांढरे विष तयार केले जात असल्याचा खळबळजनक खुलासा झाला आहे. सध्या या घटनेचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. महत्त्वाचे म्हणजे दुधात भेसळ करणाऱ्या व्यक्तीकडे अनेक नामांकित कपन्यांच्या दुधाच्या पिशव्या सापडल्या आहेत. सोशल मीडियात हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. डी.एन नगर पोलिसांकडून या व्हायरल व्हिडिओ संदर्भात माहिती मिळाली आहे, हा जुना व्हिडिओ आहे आणि यावर कारवाई करण्यात आली आहे. असे सांगितले जाते. वास्तविक भेसळीचा हा भयाण प्रकार दिसून येत आहे. देशातील बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना सद्या ३०० ते ३५० रुपये प्रति किलो भाव मिळतो आहे. तर चीनचा बेदाणा १५० ते २०० रुपये प्रति किलोने मिळतो आहे. तो बेदाणा आयात करून इथले दर पाडले जात आहात. याबाबतीत द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कोल्ड स्टोरेज वर धाड टाकून परदेशीं बेदाणा आयात केल्याचे सिद्ध केले आहे. आयात केलेला स्वस्त आणि दर्जा हीन बेदाणा प्रोसेसिंग करून भारतीय असल्याचे बनाव करून तो ३५० टे ४०० ला विकण्याचा डाव सुरु आहे तो उधळून लावण्यात आला आहे. द्राक्ष बागा काढून टाकण्याचे सत्र सुरु आहे. ज्या शेतकऱ्यांकडे द्राक्ष आणि बेदाणा आहे, त्यांना मात्र चांगला दर मिळत आहे. अशा परिस्थितीत तासगांव आणि सांगलीचे व्यापारी त्यांच्या अन्नात माती मिसालण्याचा उद्योग करत असतील तर योग्य नाही. चुकीच्या बाबतीत विचार झाला पाहिजे. बेकायदेशीरपणे बेदाणा आयात करून केमिकलची प्रक्रिया करून भारतीय पॅकिंगमध्ये विक्री केली जात आहे. त्यामुळे फसवणूक होत असून त्याचा फटका द्राक्ष बागायतदारांना बसत आहे. त्यामुळे या रॅकेटमध्ये सहभागी असणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. मुळात अन्नात भेसळ होत असेल, चुकीच्या पद्धतीने माल विक्री होत असेल तर ते योग्य नाही. राज्यात अन्नात भेसळ करण्यारे एक रॅकेट असू शकते. अनेकदा ते भेसळ आहे का नाही हे सामान्य जनतेला ओळखता येत नाही. त्यामुळे राज्यातील अन्न व भेसळ तपासणी अधिकारी यांनी सतत सतर्क असले पाहिजे. राज्यातील जनतेला किमान विषमुक्त पदार्थ मिळाले पाहिजेत. सर्व पदार्थात भेसळ होत असेल तर खावे काय असा प्रश्न निर्माण होत आहे. पालाभाज्या हिरव्या राहाव्यात यासाळी केमिकलचा फवारा मारला जातो. टमाटे असो किंवा भोपळे हे अधिक मोठे व्हावेत यासाठी इंजेक्शन दिले जाते. अनेक सोशल मिडीयावर व्हीडीओ व्हायलर होताना दिसून येत आहेत. प्रत्येक बाब ही रासायनिक बनविली जात आहे. याचा परिणाम हा आरोग्यावर होत असून दुर्धर रोग वाढत आहेत. पुर्वीपेक्षा कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. पुर्वीपेक्षा मधुमेह व अतिउच्चरक्त दाबा अनेकांचा वाढत आहे. एक तर नियमित व्यायामाचा अभावा आहे. त्यापेक्षा जे अतिरीक्त खान-पान आहे याचा परिणाम शरिरावर होत आहे. पुर्वी श्रम अधिक होते. आता पुरूषा बरोबर महिलां ही श्रम करीत नाहीत. सर्व काम मशिनद्वारे होताना दिसून येत आहेत. झाडणे, दळण करणे, पायऱ्या न चढणे अशी दररोजची श्रमाची कामे आता केली जात नाहीत. याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. त्यातच भेसळयुक्त आहार हा पोटात जात आहे. दुध भेसळ, फळे भेसळे, अन्न धान्य भेसळ असेल तर काय शुद्ध आहे. कोणते पदार्थ खाण्यासाठी योग्य आहे या बाबत प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. या बाबत आता सरकारने विचार करून कडक नियमावली बनविण्याची गरज आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात भेसळीचे प्रमाण वाढते आहे. कशात ही भेसळ केली जात आहे. भेसळ करणाऱ्यास भिती उरली नाही. त्यामुळे या बाबत कडक धोरणाची गरज आहे. सणासुदीच्या काळात तर भेसळीचे प्रमाण वाढलेले असते. अनेकदा नियमाचे भंग केल्याने कारवाई होते. त्यामुळे वेळीच सावध होऊन जे भेसळ करणारे आहेत त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात कारवाईची गरज आहे. दुध हे लहानापासून मोठ्या पर्यंत पिले जातो. भेसळीचे प्रमाण रोखले पाहिजेत. कडक नियमावली व कायद्याची गरज आहे.

# दृष्टिकोनाचे दर्शन

संधी आणि साधने सर्वांकडे सारखीच असतात, परंतु एखादे कार्य 'इतिहास' तेव्हाच बनते, जेव्हा त्यामागे निस्वार्थी भावना आणि दूरगामी दृष्टिकोन असतो. ''हात केवळ कृती करतात, पण इतिहास तोच लिहितो ज्याचा दृष्टिकोन हृदयाशी जोडलेला असतो.'' ही कथा केवळ तीन चित्रकारांची नसून मानवी दृष्टिकोनाचे दर्शन घडवणारी एक जीवनगाथा आहे. राजकन्या 'कुंचला'च्या रूपाने आपण अशा सत्याचा शोध घेतो, जे केवळ डोळ्यांना नव्हे तर आत्म्याला दिसावे.



एका समृद्ध राज्याचा राजा विरधवल यांना एकुलती एक मुलगी होतीराजकन्या 'कुंचला'. नावाप्रमाणेच तिचे कुंचल्यावर, रंगांवर आणि चित्रांवर अफाट प्रेम होते. बालपणापासून ती चित्रांच्या दुनियेत रमत असे. राजकन्या 'कुंचला' अजाणपणापासूनच रंगांच्या जादुई दुनियेत हरवून जायची. ती केवळ कागदावर चित्र काढत नसे, तर बागेतील फुलांच्या पाकळ्यांतील रंग, पावसाच्या थेंबांतील चमक आणि सायंकाळच्या आकाशातील केशरी छटा न्याहाळण्यात तासन् तास घालवायची. कधी जमिनीवरच्या धुळीत बोटांनी नक्षी काढणे, तर कधी झाडांच्या पानांवरील शिरा अभ्यासणे, यातच तिचे विश्व सामावले होते. तिच्यासाठी प्रत्येक रंगाची एक वेगळी भाषा होती आणि प्रत्येक रेषा एक न सांगता येणारी गोष्ट होती.

'कुंचला' चे वय वाढले आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर येताच कुंचला अचानक अंतर्मुख झाली. तिचे हसणे, बोलणे आणि चित्र काढणेही सुटले. तिच्या डोळ्यांत एक अनामिक दुःख आणि निराशा दाटली होती. काळजीपोटी राजाने तिला विचारले, ''बाळा, तुला काय हवे? कशाने तुझे हे दुःख दूर होईल?'' कुंचला शांतपणे म्हणाली, ''बाबा, मला जगातील सर्वात 'सर्वोत्तम' चित्र पाहायचे आहे. असे चित्र जे केवळ डोळ्यांनाच नाही, तर माझ्या आत्म्याला स्पर्श करेल. जोपर्यंत मला ते चित्र मिळत नाही, तोपर्यंत माझ्या मनातील ही मरगळ दूर होणार नाही.''

राजाने संपूर्ण राज्यात दवंडी पिटवली. हजारो चित्रकार आपली सर्वोत्कृष्ट चित्रे घेऊन दरबारात आले. कुंचला प्रत्येक चित्र पाहत असे, पण तिची नजर काहीतरी वेगळेच शोधत होती. शेवटी राजाने स्वतः तीन प्रसिद्ध चित्रकारांची निवड केली आणि त्यांची चित्रे कुंचलेसमोर मांडली.

पहिल्या चित्रकाराने एक भव्य चित्र आणले होते. ते तांत्रिकदृष्ट्या अतिशय अचूक होते. सोन्याच्या चौकटीत मढवलेले ते चित्र पाहताच राजाला वाटले की हेच सर्वोत्तम असावे. पहिल्या चित्रकाराने आपले चित्र राजकन्येला आवडावे, यापेक्षा ते राजाला कसे 'प्रभावित' करेल याचाच विचार जास्त केला होता. त्याने विचार केला की, जर मी तांत्रिकदृष्ट्या बिनचूक रेषा काढल्या आणि महागड्या रंगांचा वापर करून चित्र



लेखक :
**राहूल हरीभाऊ इंगळे पाटील**
मोबाइल ९८९०५७७१२८

सोन्याच्या चौकटीत मढवले, तर त्याची 'राजेशाही किंमत' आपोआप वाढेल. त्याचा दृष्टीकोन केवळ व्यवहार आणि प्रदर्शनावर आधारित होता. त्याने राजकन्येच्या मनातील भावनेपेक्षा राजदरबारातील प्रतिष्ठेचा आणि चित्राच्या संभाव्य किमतीचा विचार करून ते चित्र केवळ एक 'उत्कृष्ट वस्तू' म्हणून साकारले होते.

त्या चित्राकडे क्षणभर पाहिले आणि नजर वळवली कुंचला म्हणाली, ''बाबा, यात कौशल्य आहे पण प्राण नाही. या चित्रकाराने हे चित्र काढताना रंगांच्या किमतीचा आणि बाजाराचा विचार केला आहे. हे चित्र 'विकण्यासाठी' आहे, 'जगण्यासाठी' नाही. हे केवळ कागदावरचे ओझे आहे.''

दुसऱ्या चित्रकाराने असा विचार केला की, राजकन्या निराश आहे, म्हणून तिला 'आनंद' देणारे दृश्य समोर मांडावे. त्याने मनाशी ठरवले की, निसर्गातील सर्वात मोहक रंग आणि फुलांची उधळण पाहून कुंचला क्षणभर तिचे दुःख विसरेल. त्याचा पूर्ण कल केवळ 'बाह्य सौंदर्यावर' आणि डोळ्यांना सुखावणाऱ्या चकचकीतपणावर होता. त्याला वाटले की, चित्रातील रंगांचा हा 'लेप' राजकन्येच्या मनातील अंधार दूर करेल, पण दुर्दैवाने त्याने केवळ वरवरच्या आकर्षणाचा विचार केला, त्यातील खोलवरच्या भावनेचा नाही. दुसऱ्या चित्रकाराने नंदनवनाचे चित्र काढले होते. रंगांची उधळण, सुंदर फुले आणि मोहक निसर्ग त्यात होता. राजाला ते खूप सुखावह वाटले.

कुंचला चित्र पाहताच म्हणाली, ''हे चित्र केवळ डोळ्यांना फसवणारे आहे. हे एक सुंदर आवरण आहे, पण त्यापलीकडे काहीही नाही. हे चित्र माझ्या घराची भिंत सजवू शकेल, पण माझ्या मनातील पोकळी भरू शकणार नाही. सौंदर्याचा हा लेप कालांतराने फिका पडेल.''

तिसऱ्या चित्रकाराने एक साधे, थोडे विस्कटलेले आणि वरवर पाहता 'अपूर्ण' वाटणारे चित्र समोर ठेवले. त्या चित्रात एक म्हातारी आजी एका लहान मुलाचा हात धरून क्षितिजाकडे पाहत होती. रंगांचा कोणताही डामडौल नव्हता, पण त्या रंगांच्या फटकाऱ्यात एक अनामिक ओढ होती. तिसऱ्या चित्रकाराने असा विचार केला की, राजकन्येचे दुःख दूर करण्यासाठी रंगांच्या चकचकीतपणापेक्षा 'जिव्हाळ्याचा ओलावा' अधिक महत्त्वाचा आहे. त्याने चित्रात एखादे वैभवशाली दृश्य न मांडता, मानवी नात्यांमधील हळवेपण आणि संघर्षातून जन्मलेले 'सत्य' मांडायचे ठरवले. त्याचा उद्देश चित्र विकणे किंवा सजवणे हा नव्हता, तर राजकन्येच्या एकाकी मनाशी 'संवाद' साधणे हा होता. त्याने स्वतःचे अनुभव आणि वेदना रंगात मिसळल्या, जेणेकरून ते चित्र केवळ एक दृश्य न राहता काळजाला भिडणारी एक जिवंत कविता बनावे.

ते चित्र पाहताच राजकन्या कुंचला शहारली. तिच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहू लागले. तिने त्या चित्राला स्पर्श केला आणि ती पहिल्यांदाच मनापासून हसली. राजा चक्रावून गेला. त्याने विचारले, ''बाळा, या साध्या चित्रात तुला असं काय दिसलं?''

कुंचला भावूक होऊन म्हणाली, ''बाबा, या चित्रात चित्रकाराने रंग नाही, तर स्वतःचे अश्रू आणि माया सांडली आहे. या चित्रात मला 'आईचं थकलेलं हसू' आणि 'पावसात भिजलेली लहानगी पावलं' दिसत आहेत. या चित्रातील तुटलेल्या रेषांमध्ये जीवनाचा संघर्ष आहे आणि विस्कटलेल्या रंगांमध्ये अथांग प्रेम आहे. हे चित्र माझ्याशी संवाद साधतंय!''

राजा विरधवल यांनी त्या तिसऱ्या चित्रकाराला बोलावले आणि विचारले, ''तुझ्या चित्रात अशी काय जादू आहे?'' चित्रकार नम्रपणे म्हणाला, ''महाराज, पहिले दोन चित्रकार 'हात' आणि 'मेंदू' ने काम करत होते. मी मात्र हे चित्र 'हृदयाने' जगलो होतो. जोपर्यंत आपण स्वतः दुःखाचा अनुभव घेत नाही, तोपर्यंत आपण दुसऱ्याचे दुःख पुसू शकत नाही.'' राजाने त्या चित्रकाराला सुवर्णमोहोरांनी सन्मानित केले आणि राजकन्या कुंचला पुन्हा आनंदी झाली.

## चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो आणतात 'हे' ड्रायफ्रूट्स, आजपासून सुरु करा सेवन

हिवाळ्यात चमकदार त्वचा मिळवणे तसे अनेकांना कठीण वाटते. परंतु तुमच्या आहारात ड्रायफ्रूट्स समाविष्ट करा. ड्रायफ्रूट्समध्ये असलेले जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि हेल्दी फॅट्स त्वचेला आतून पोषण देतात. ज्यामुळे ती निरोगी, मऊ आणि चमकदार बनते. आज आम्ही तुम्हाला अशा ड्रायफ्रूट्सबाबत सांगणार आहोत, जे तुम्हाला नैसर्गिकरित्या ग्लोइंग स्किन देण्यास मदत करतात.



मनुके–

मनुक्यासारखे ड्रायफ्रूट्स खाल्ल्याने रक्त शुद्ध होते. आणि पिंपल्स आणि डाग कमी होतात. मनुका हे लोह आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले ड्रायफ्रूट्स आहे. हिवाळ्यात मनुका खाल्ल्याने त्वचा स्वच्छ आणि उजळ होण्यास मदत होते. चमकणारी त्वचा मिळवण्यासाठी तुम्ही पाण्यात भिजवलेले १० ते १२ मनुके खाऊ शकता.

बदाम–

बदाम हे फक्त मेंदूसाठीच नाही तर त्वचेच्या ग्लोसाठी देखील एक सुपरफूड आहे. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई असते. जे त्वचेला यूव्ही किरणांपासून वाचवते आणि निस्तेज आणि कोरडी त्वचा देखील मऊ करते. हिवाळ्यात दररोज सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले बदाम खाल्ल्याने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. बदाम डाग आणि सुरकुत्या देखील कमी करतात.

पिस्ता–

हिवाळ्यात पिस्ता त्वचेला हायड्रेट करतो आणि निस्तेज त्वचा ताजीतवानी करतो. हिवाळ्यात दररोज ६ ते ७ पिस्त्याचे तुकडे खाल्ल्याने डाग कमी होण्यास आणि त्वचेला गुलाबी चमक येण्यास मदत होते. महागड्या प्रॉड्क्टसऐवजी पिस्ता खाल्ल्यास चेहरा चमकू लागतो.

अक्रोड

तुम्हीही चेहऱ्यावरील डाग आणि सुरकुत्या कमी करण्यासाठी काहीतरी शोधत असाल तर अक्रोड हा उत्तम पर्याय आहे. अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असतात. हिवाळ्यात दररोज २ ते ३ अक्रोड खाल्ल्याने त्वचेच्या पेशी दुरुस्त होण्यास मदत होते, त्वचेची लवचिकता वाढते आणि सुरकुत्या टाळण्यास मदत होते. जर तुम्हाला लहान वयात सुरकुत्या येण्याची काळजी वाटत असेल तर तुमच्या आहारात अक्रोडचा नक्की करा.

## हिवाळ्यात रोज खा अननस, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे

अननस हे एक अतिशय चविष्ट आणि पौष्टिक फळ आहे. अननस अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, प्रथिने, कॅल्शियम, फायबर, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, सोडियम, जस्त, तांबे आणि मँगनीज अशी अनेक खनिजे असतात.

हिवाळ्यात अननस खाणे खूप फायदेशीर ठरू शकते. अननस खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. याव्यतिरिक्त, अननसचे नियमित सेवन केल्याने अनेक आरोग्य समस्या दूर होण्यास मदत होते. आज आपण हिवाळ्यात अननस खाण्याचे फायदे जाणून घेऊया.

वजन कमी करण्यास फायदेशीर–

वजन कमी करण्यासाठी अननस खाणे देखील फायदेशीर मानले जाते. अननसमध्ये असलेले घटक शरीरातील चरबी वितळवण्याची प्रक्रिया करतात. ज्यामुळे शरीरात साठलेली अतिरिक्त चरबी कमी होते. अननसात फायबरचे प्रमाण देखील चांगले असते, जे वजन कमी करण्यास मदत करते.

पचनसंस्था मजबूत करते–

हिवाळ्यात पचनाच्या समस्या प्रचंड वाढतात. अननस खाणे पचनसंस्थेसाठी खूप फायदेशीर मानले जाते. अननसमध्ये ब्रोमेलेन नावाचा पदार्थ असतो. जो प्रोटीन शोधण्यास मदत करतो. नियमित सेवनाने बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्या दूर होण्यास मदत होते.

संधिवातची समस्या कमी करते–

हिवाळ्यात संधिवाताची समस्या प्रचंड वाढते. अशा परिस्थितीत, अननसाचे सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. अननसात अँटी इंफ्लीमेंट्री गुणधर्म असतात. जे संधिवातशी संबंधित वेदना आणि सूज कमी करण्यास मदत करतात. तसेच, अननसातील कॅल्शियम हाडांसाठी अत्यंत फायदेशीर आहे.

रोगप्रतिकारक शक्ती वाढते–

हिवाळ्यात अननस खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. अननसात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी हे घटक फायदेशीर मानले जातात. हिवाळ्यात अननसाचे सेवन केल्याने सर्दी आणि संसर्गापासून तुमचे संरक्षण होऊ शकते.

## निरोगी त्वचेसाठी कडुलिंब आणि बेसन घालून बनवा फेस पॅक



त्वचा निरोगी ठेवण्यासाठी कडुलिंब आणि बेसनाचा फेस पॅक लावा. कडुलिंब आणि बेसन हे नैसर्गिक घटक आहेत. हे दोन घटक चेहऱ्यावर लावल्याने कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. कडुनिंबात अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे मुरुम, पुरळ आणि त्वचेचे संक्रमण कमी करण्यास मदत करतात. बेसन हे एक चांगले एक्सफोलिएंट आहे जे त्वचेच्या मृत पेशी काढून टाकते, छिद्र साफ करते आणि त्वचेला ताजेपणा देते. कडुलिंब आणि बेसन यांचे मिश्रण चेहऱ्यावरील डाग आणि मुरुम कमी करण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा स्वच्छ होण्यास मदत होते. या लेखात आपण कडुनिंब आणि बेसन फेस पॅक बनवण्याची पद्धत आणि फायदे जाणून घेणार आहोत.

**कडुलिंब बेसन फेस पॅक**

**साहित्य:**

२ चमचे कडुलिंब पावडर
२ चमचे बेसन
१ चिमूट हळद
दही
गुलाब पाणी

पद्धत:

एका भांड्यात २ चमचे कडुलिंबाची पूड आणि २ चमचे बेसन घाला.
त्यात १ चिमूट हळद घाला.
आता त्यात हळूहळू दही आणि गुलाबजल टाका.
जाड पेस्ट तयार होईपर्यंत ते मिसळा.
आपला चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.
आता ही पेस्ट चेहरा आणि मानेवर समान रीतीने लावा.
हा फेसपॅक १५ ते २० मिनिटे ठेवा.
मिश्रण कोरडे होईपर्यंत फेसपॅक लावा.
कोरडे झाल्यानंतर, आपला चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.

फेस पॅकचे फायदे

कडुलिंबात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. यामुळे मुरुमांची समस्या दूर होण्यास मदत होते.

कडुलिंब जळजळ कमी करते आणि त्वचेची लालसरपणा आणि जळजळ शांत करते.

कडुलिंब त्वचेची खोल छिद्रे साफ करते आणि त्वचा निरोगी बनवते.

कडुलिंबाच्या नियमित वापराने चेहऱ्यावरील डाग आणि डाग कमी होतात.

बेसन हे एक नैसर्गिक एक्सफोलिएंट आहे जे त्वचेच्या मृत पेशी काढून टाकण्यास मदत करते.

बेसन जास्त तेलावर नियंत्रण ठेवते आणि त्वचेचा रंग सुधारतो.

बेसन लावल्याने त्वचा कोरडी होत नाही, उलट त्वचेची आर्द्रता टिकून राहण्यास मदत होते.

काही सामान्य चुका टाळल्या पाहिजेत

फेसपॅक स्वच्छ करण्यासाठी गरम पाण्याचा वापर करू नका. नेहमी थंड पाणी किंवा कोमट पाणी वापरा.

फेसपॅक चोळून धुणे टाळा. गोलाकार हालचालीत हलक्या हातांनी धुवा जेणेकरून त्वचेवर स्क्रॅच होणार नाहीत.

फेसपॅक लावल्यानंतर त्वचेला मॉइश्चरायझ करणे महत्त्वाचे आहे.

फेसपॅक काढल्यानंतर त्वचेवर चांगले मॉइश्चरायझर लावा जेणेकरून ओलावा टिकून राहील.

फेसपॅक लावल्यानंतर आणि काढून टाकल्यानंतर, घाणेरड्या हातांनी चेहऱ्याला स्पर्श करणे टाळा.

जास्त वेळ फेसपॅक लावणे टाळा. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा फेसपॅक लावणे पुरेसे आहे.

## वीज बचतीचे हे आहेत ३ सूत्र, पाळल्यास निम्मे होईल बिल

महागाईच्या जमान्यात उन्हाळ्यात भरमसाट वीज बिलांनी लोकांचे कंबरडे मोडले आहे. ज्यांच्या घरात दोन एसी आहेत, त्यांचे बिल १०,००० रुपयांपेक्षा कमी नाही. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात मध्यमवर्गीय कुटुंबाचे बजेट बिघडते.

आज आम्ही तुमच्यासाठी तुमचे वीज बिल निम्म्याने कमी करण्यासाठी तीन सूत्रे घेऊन आलो आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही तुमचे वीज बिल अर्ध्यावर कमी करू शकता, ज्यामुळे तुमचे बजेट बिघडणार नाही आणि तुमचे पैसेही वाचतील.

**एसीमध्ये करा हे बदल**

उन्हाळ्यात एअर कंडिशनर्स सर्वात जास्त वीज वापरतात, लोक थंड होण्यासाठी प्रत्येकी २० तास एअर कंडिशनर चालवतात. अशा स्थितीत एका वातानुकूलित यंत्रामुळे महिन्याभरात तीन ते चार हजार रुपयांची वीज लागते. तुम्हाला तुमचे वीज बिल कमी करायचे असेल, तर तुम्ही इन्व्हर्टर एअर कंडिशनर वापरावे. ज्यामुळे विजेचा वापर कमी होतो.

**सीलिंग फॅनमध्ये बदल करा**

आतापर्यत बाजारात ७० ते १२० वॅट्सचे सिलिंग फॅन उपलब्ध होते, मात्र आता बीएलडीसीचे पंखे बाजारात आले आहेत. जे ३२ वॅट्सचे आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की जुन्या पंख्यांच्या तुलनेत इडऊ पंखे निम्म्याहून कमी वीज वापरतात आणि त्यांचा वेग आणि हवा देण्याची क्षमताही जास्त असते.

**मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये करा हे काम**

जर तुम्ही स्वयंपाकघरात मायक्रोवेव्ह ओव्हन वापरत असाल, तर तुम्ही हे काळजीपूर्वक वाचा. वास्तविक, वापरकर्ते मायक्रोवेव्ह ओव्हन वापरल्यानंतर ते बंद करत नाहीत. अशा परिस्थितीत, मायक्रोवेव्ह अतिरिक्त वीज वापरत राहते आणि तुमचे मीटर सतत चालू राहते. म्हणून, मायक्रोवेव्ह ओव्हनचे काम पूर्ण झाल्यावर, आपण ते बंद केले पाहिजे. या सूत्रांचा अवलंब करून तुम्ही केवळ विजेची बचत करू शकत नाही, तर पर्यावरण सुरक्षित ठेवण्यातही हातभार लावू शकता.

# सुंदर आणि दाट केसांसाठी



सुंदर आणि लांब केस हे प्रत्येक महिलेला आवडते. परंतु आजच्या काळात चुकीचे खाणेपिणे आणि धकाधकीच्या जीवनशैलीचा परिणाम केवळ आरोग्यावर होत नाही तर त्याचा विपरीत परिणाम केसांवरही दिसून येत आहे. केस गळण्यापासून ते टक्कल पडणे आणि केस अकाली पांढरे होणे या समस्यांचा तुमच्या सौंदर्यावर परिणाम होतो.
केसांची काळजी घेण्यासाठी त्यांना अतिरिक्त पोषण देणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत केळी आणि ऑलिव्ह ऑईल तुमच्यासाठी उपयोगी ठरू शकते. हे तुमचे केस मजबूत बनवते तसेच ओलावा प्रदान करते. केसांच्या निगा राखण्याच्या दिनचर्येत केळी आणि ऑलिव्ह ऑइलचा समावेश करण्याच्या पद्धतींबद्दल सांगत आहोत, चला या काही टिप्स जाणून घ्या.
१ कोरड्या आणि तेलकट केसांसाठी केळी आणि ऑलिव्ह ऑइल-
हा हेअर मास्क कोरड्या आणि तेलकट दोन्ही केसांवर काम करतो. त्यामुळे केसांना अतिरिक्त पोषण देण्यासाठी केळी आणि ऑलिव्ह ऑइलसोबत अंडी वापरू शकता.
केस गळती थांबवण्यासाठी केसांना भेंडीचे पाणी लावा
साहित्य-
१ पिकलेले केळे
२ अंडी
१ टीस्पून ऑलिव्ह ऑइल
१ टीस्पून मध
कसे बनवावे-
सर्वप्रथम केळीला काट्याने मॅश करा.
एका भांड्यात अंडी फेटून घ्या. आता त्यात ऑलिव्ह ऑईल आणि मध घाला.
सर्व साहित्य मिक्स करावे. तुम्ही हे मिश्रण मलमलच्या कापडाच्या साहाय्याने गाळून घ्या जेणेकरुन मिश्रणात केळीच्या गुठळ्या राहणार नाहीत.
आता तुम्ही तुमच्या केसांचे विभाग करत जा आणि हा मास्क लावा.
हे मिश्रण केसांच्या मुळापासून टोकापर्यंत लावा.
साधारण ४५ मिनिटांनंतर केस सौम्य शैम्पूने धुवा.
२ फ्रिजी केसांसाठी केळी आणि ऑलिव्ह ऑइल-
हा हेअर मास्क तुमच्या केसांना कंडिशन करतो. ज्यामुळे फ्रिजी आणि अनियंत्रित केस मॅनेज करणे सोपे होते.
-डडज ठए-ऊ घरी राहून तुमचे केस सुंदर आणि रेशमी बनवण्यासाठी पार्लरसारखा हेअर स्पा वापरून पहा
आवश्यक साहित्य
१ पिकलेले केळे
२ चमचे ऑलिव्ह तेल
कसे वापरावे-
* सर्व प्रथम, एक पिकलेले केळे घ्या आणि चांगले फेणून घ्या.
* या केळीच्या पेस्टमध्ये ऑलिव्ह ऑइल घालून चांगले मिसळा.
* आता तुमचे केस विभाजित करा आणि हेअर कलर ब्रशच्या मदतीने, मिश्रण मुळांपासून लावायला सुरुवात करा.
* केसांचा मास्क नीट लावा जेणे करून स्कॅल्प आणि केसांना पूर्णपणे लागेल.
* आपले केस सैल बनमध्ये बांधा आणि शॉवर कॅपने झाकून ठेवा.
* केसांचा मास्क ३० मिनिटांसाठी ठेवा.
* आपले केस शैम्पू करण्यापूर्वी मास्क थंड पाण्याने धुवा.

# भाषेचा वापर





**परामर्श :डॉ. दीपक बोरगावे**

पुरुष भाषा कशी वापरतो? विशेषतः स्त्रियांच्या संदर्भात तो कशी वापरतो? सुरुवातीला, संस्कृती या संकल्पनेचा अर्थ काय आहे हे थोडक्यात समजावून घेण्याचा प्रयत्न करू. संस्कृती समजावून घेण्याच्या प्रयत्नात सांस्कृतिक ऐतिहासिक द्वंद्व ही गोष्ट प्रथमत: रेमंड विल्यम्स यांनी मांडली. संस्कृती म्हणजे जगण्याचा एक मार्ग, संस्कृती म्हणजे केवळ कला, साहित्य, संगीत नव्हे, किंवा कपडेलत्ते, रंग, नृत्य, शृंगार, चित्रकला, नाटक, चित्रपट पाहणे नव्हे. तर संस्कृती म्हणजे, रोजच्या जगण्यातील कलह, संघर्ष आणि समस्यांना सामोरे जाण्याचा एक जीवन मार्ग आणि इथेच संस्कृतीचा आणि भाषेचा एक महत्त्वाचा बंध आपल्या लक्षात येतो. या अंगाने विचार केल्यास सांस्कृतिक भौतिकवाद  ही संकल्पना लक्षात घ्यावी लागते.

**मालवून टाक दीप | चेतवून अंग अंग | राजसा किती दिसात | लाभला निवांत संग |**

शृंगार रसाने भरलेल्या सुरेश भटांच्या या गीतात काय आढळते? हे गाणं पुरुषांनी लिहिलेले आहे, पण यातील कल्पित निवेदिका स्त्री आहे. इथे पुरुषाला स्त्रीकडून अपेक्षित असलेली स्वामित्वाची भावना व्यक्त झाली आहे. जीवनात समस्या सोडवण्यासाठी आपण भाषेचा वापर कसा करतो हे पाहणे, या दृष्टीने उद्बोधक ठरावे. भाषा ही केवळ संप्रेषण म्हणून वापरली जात नाही, तर ती आपल्या अनेक समस्या सोडवण्यासाठीही वापरली जाते. आपणास काही सांगायचे नाही, ही गोष्टही भाषा नावाच्या सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात महत्त्वाची असते. भाषा ही संप्रेषणासाठी वापरली जात नाही, तर तिचा उपयोग हा बऱ्याचदा संप्रेषण पुढे ढकलण्यासाठी किंवा वेगळाच संदेश जावा यासाठी केला जातो, असे नोम चॉम्स्की यांनी म्हटले आहे.

भाषेच्या वाच्य रूपाचा विचार केल्यास, निरर्थक बोलत राहणे, थापा मारणे, भाषिक रॅगिंग करणे, शिवीगाळ करणे अशी अनेक उदाहरणे आपल्या समोर येतात. भाषेच्या लिखित रूपाचा विचार केल्यास, अर्थ दडवण्याचा प्रयत्न करणे (हे बहुतेकदा कलेच्या क्षेत्रामध्ये प्रकर्षाने प्रतिबिंबीत होते), सैद्धांतिक लेखन, गूढरम्य ललित लेखन, कायद्यात वापरली जाणारी भाषा अशी अनेक उदाहरणे देता येतील. अर्थातच वाच्य रूपातील भाषिक हिंसा ही लिखित रूपातील भाषिक हिंसेपेक्षा भयावह असते.

**स्त्रीवरील भाषिक छळ**

साहित्यामध्ये पुरुष स्त्रीच्या संदर्भात कशी भाषा वापरतो, हा एक मोठा संशोधनाचा विषय होऊ शकतो. या संदर्भात विजय तेंडुलकरांच्या नाटकात काही उल्लेखनीय उदाहरणे मिळतात. “सखाराम बाईंडर“मध्ये शिवीगाळ उघडउघड आहे, तर “शांतता ! कोर्ट चालू आहे“मध्ये ही हिंसा समजायला अवघड आहे. लीला बेणारे यांचं लग्न का झालं नाही? ३४ व्या वर्षीही त्या अविवाहित कशा? कोर्टात मिस बेणारे काहीच बोलत नाही म्हणून त्यांच्यावतीने त्यांची ज्येष्ठ मैत्रीण काहीबाही बोलत सुटते. सर्व पुरुष पात्रे मिटक्या मारत मिस बेणारेचं शल्य ऐकत राहतात. इथे एक स्त्री ही पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली स्त्री-विरोधी बोलताना दिसते. ‘लग्न व्हायला काय हरकत आहे? पण नाही; लग्नच करायचेच नाही, कारण लग्न न करता सगळं सुख जर मिळत असेल तर, लग्न कशाला करा? शिवाय लग्नानंतर जबाबदार्या कोण झेलणार? आमच्यावेळी असं नव्हतं ! मुलगी नकटी, बुटकी, काळी कशीही असो, तिचं लग्न हे व्हायचंच! हा काय प्रकार म्हणायचा?’ असा हा स्त्रीवरील भाषिक छळ आणि हिंसा इथे रंगत जाते. स्त्रीवरचा चारित्र्यहननचा आरोप हे रूप देतो. एका प्राध्यापिकेला अलीकडेच पीएच.
डी. ही पदवी मिळाली, तेव्हा आमचे एक  पुरुष  मित्र म्हणाले, ‘तिला काय येतं? नुसती मठ्ठ आहे, मेंदू आहे गुडघ्यात. सरळ आहे; आपल्या गाईडकडूनच तिने ही पीएच.डी. मिळवली असणार.’ लीला बेणारे यांची इथे प्रकर्षाने आठवण होते. तेंडुलकरांच्या बहुतेककरून सगळ्याच नाटकात हिंसा  या विषयाभोवती त्यांची सारी संहिता फिरत असते आणि पुरुष हा स्त्रीच्या संदर्भात कशी भाषा वापरतो याची उत्तम उदाहरणे त्यांच्या अनेक नाटकात मिळू शकतात. स्त्रिच्या संदर्भात पुरुष भाषेतून खूप हिंसा व्यक्त करतो. भीती, दहशत निर्माण व्हावी हा त्याचा उद्देश असतो. शिवीगाळ करणे हे एक हमखास यशस्वी होणारे शस्त्र तो वापरतो. इस्लामिक संस्कृतीत तोंडी तलाखची (घटस्फोटाची) कायदेशीर सोय आहे; पण पुरुषाला तोंडी तलाख देण्याची सोय स्त्रीला मात्र नाही.

**स्त्रियांचा उपहास**

विविध प्राचीन ग्रंथात स्त्रियांविषयी वापरलेल्या प्रतिमा, रूपके, उपमा निर्भर्त्सना, अपमान आणि शिवीगाळ दिसते. ‘बायबल’मध्ये स्त्रीला निरर्थक बडबड करत राहणारी व्यक्ती असे म्हटले आहे. स्त्री ही  सुंदरच  असते आणि ती पुरुषाला वश करते, वाकडे पाऊल टाकायला प्रवृत्त करते  ) असे म्हटले आहे. बायबलमधील इव्ह आणि ॲडम यांची कथा हेच सांगते.
आपल्या प्राचीन धर्मग्रंथातून स्त्रीसाठी पायात घालायची चप्पल  अशी उपमा वापरली आहे. वापरलेली वस्तू म्हणून आपण चप्पल घरातील एका कोपर्यात ठेवतो आणि तिची कोपर्यातील जागा ठरलेली असते. स्त्रीचे हे दुय्यमत्व भयंकर अशा प्रतिमांतून व्यक्त झाले आहे. कुटुंबात किंवा समाजातल्या कुठल्याही चर्चाविश्वात (डिस्कोर्स) स्त्रीला सहभागी करून घेऊ नये, कारण तिच्या तोंडात काही राहत नाही. म्हणून तिला या सगळ्यांपासून दूर ठेवणे हेच उत्तम, अशी सूचनाही आहे. स्त्रीचा उल्लेख  उपभोग्य पदार्थां मध्ये केला आहे (आ. ह. साळुंखे, ‘हिंदू संस्कृती आणि स्त्री’, पृ. १३६). कावळा, कुत्रा, स्त्री आणि शूद्र हे खोटे असतात त्यांच्याकडे पाहू नये... गाढव, नगरा, दासी, गावंढळ पुरुष, पशू आणि स्त्रिया यांना काठीने मारून त्यांच्याकडून सेवा व भोग घ्यावेत. त्यांना सन्मानाने वागवावे अशी त्यांची पात्रता नसते (पृ. १३७). अशी विपुल उदाहरणे आहेत.

**बोली भाषेतील फरक**

भाषेचा संबंध हा बोलणारी स्त्री आहे की बोलणारा पुरुष किंवा मुलगा आहे की मुलगी यावरूनही ठरत असतो. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूरकडची स्त्री पुरुषासारखे बोलते. म्हणजे, प्रमाण भाषेप्रमाणे, ‘मी जेवले’ किंवा ‘मी झाडून काढते’ म्हणण्याऐवजी, ‘मी जेवलो’, मी झाडून काढतो’ असे ती म्हणते. इथे कर्ता हा स्त्रीलिंगी असूनही क्रियापद हे पुल्लिंगी म्हणजे, ‘जेवलो, काढतो’ असे का व्हावे? हा एक केवळ व्याकरणीय प्रश्न आहे का? असे विचारता येते. येथील स्त्री आपल्या मैत्रिणीला, ’काय मर्दिनी, कुठे पत्त्या हाय? असे म्हणते.
‘मर्दिनी’ हे ‘मर्द’ (उर्दू शब्द) याचे स्त्रीलिंगी रूप आहे. म्हणजे या प्रदेशातील स्त्री स्वतः ला ‘मर्द’ म्हणजेच ‘मर्दिनी’ समजते का? (महिषासुरमर्दिनी हे अजून एक त्यातले रूप) त्याचा अर्थ या प्रदेशातील स्त्री ही पुरुषी वर्तनाची आहे का? ती पुरुषाप्रमाणे वाटते का? असे बरेच सांस्कृतिक किंवा लिंगभेदाबाबतचे प्रश्न उपस्थित करता येऊ शकतात. कोल्हापूरची स्त्री आणि पुण्याची स्त्री यामध्ये अर्थातच संस्कृतिक अंतर आहे. याचा अर्थ असा नव्हे की कोल्हापूर-सांगली-सातारा भागातील स्त्री ही ’पुरुषी’ आहे. हा प्रादेशिक संस्कृतीचा भेद आहे आणि त्या प्रदेशातील भाषा तिथला समूह हा असाच वापरतो. भाषा ही या अर्थाने एक सांस्कृतिक संकेत म्हणावी लागेल. स्त्रीची देहबोली आणि पुरुषाची देहबोली, चित्रपट, कादंबरी, टीव्ही सिरीज, कविता अशा अनेक माध्यमांतून पुरुष ’स्त्रीला’ भाषिक रूपात कसे सादर करतो? हे पाहणे उद्बोधक ठरावे. महेश भट यांच्या ’अर्थ’ या चित्रपटातील शेवटचे दृश्य खूप बोलके आहे. या चित्रपटातील नायकाने आपल्या पत्नीला सोडून दिलेले असते. तो आपल्या प्रेमिकाबरोबर राहायला जातो. पण शेवटी त्याचा भ्रमनिरास होतो आणि तो परत आपल्या पत्नीकडे येतो आणि म्हणतो, ‘मला माफ कर. आपण परत नव्याने संसार करू’, अशी तो तिला विन-वणी करतो. यावेळी त्याची पत्नी म्हणते, ‘तुझ्या जागी, हे जर मी केले असते, तर तू मला स्वीकारले असते का?’ या प्रश्नाने या चित्रपटाचा शेवट होतो.
सांस्कृतिक दृष्टिकोनातून याचा विचार केला तर, पुरुषाने भाषा कशी वापरावी याचेही संकेत कुटुंब, समाज आणि इतर सामाजिक संस्था ठरवतात. साधारणपणे पुरुषाने आक्रमक भाषा वापरायची असते किंवा त्याला तसे बोलायचे, वागायचे संकेत असतात. असे केल्याने पुरुषाचे पौरुषत्व सिद्ध होते आणि समाजात त्याबद्दल त्याचे कौतुक होते. ‘सिंघम’ कोणत्या भाषेत बोलतो बघा? आणि त्याची नायिका कोणत्या भाषेत बोलते?
तात्पर्य, पुरुष कशी भाषा वापरतो ही गोष्ट समजावून घेताना लिंगभेद, जात, जमात, धर्म, ऐतिहासिकता, आर्थिक स्तर, कुटुंब, वर्ग, प्रादेशिक आणि देशी अस्मिता या नात्यांचा विचार करावा लागतो. भाषा आणि संस्कृती या सतत प्रवाही आणि बदलणार्या असल्या तरी, स्त्रीच्या संदर्भातला पुरुषी अहंकार जोपर्यंत जिवंत राहणार आहे, तोपर्यंत पुरुष स्त्रीच्या बाबतीत भाषिक हिंसा करत राहील आणि ही परिस्थिती बदलेल अशा प्रकारची आशा करणे विफल आहे असे वाटते.

## डॉक्टर टीप्स

**पॉवर वाढवा अगदी सोप्या घरगुती पदार्थांनी**



आत्मविश्वासी असणे देखील गरजेचे आहे.  याने समस्या दूर होईल.
विशेष: स्वस्थ विचार स्वस्थ शरीर ठेवण्यात मदत करतात. या प्रकाराच्या समस्यांसाठी मनातील भावना देखील जवाबदार असतात. सतत वासना, उत्कट विचार स्वप्रदोष किंवा शीघ्रपतन सारख्या समस्यांसाठी कारणीभूत ठरतात.अशात स्वस्थ विचार ठेवणे आवश्यक आहे कारण ही समस्या केवळ शारीरिक नसून मानसिक देखील असते. म्हणून आनंदी आणि आत्मविश्वासी असणे देखील गरजेचे आहे.

## विनोद




रमेश डोळे मिटून आरशास मोर उभा होता. त्याची आई त्याला म्हणाली, ‘रमेश, डोळे मिटून आरशासमोर कशाला उभा राहिला आहेस?’
‘अगं, मी झोपलो की कसा दिसतो ते मला बघायचं आहे.’

## संदेश

33 karod Devi Devtaon
33 karod Devi Devtaon
se Meri
ek hi Vinati
hai ki..
.
Sab Mujhko
Sirf 1,1 Rupya de do...

## सुविचार




उद्योगावाचून शक्तीचा उपयोग नाही.
– पंचतंत्र

**संस्कृत सुभाषित**

अमर्षजो हि संताप: पावकाद्दीप्तिमत्तर:
(वन पर्व, अध्याय ३५, ेक ११, महाभारत)
अर्थ – असहिष्णुतेमुळे येणारा संताप अग्निपेक्षाही जास्त प्रखर असतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.)
५. तडीपार
७. बहुदा उसने बळ
९. जुगाराचा एक प्रकार
१०. अमावस्या
११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग
१२. गंध
१४. नजरकैद, अटक
१६. योग्य, बरोबर
१८. संताप
१९. रूक्ष, कोरडे
२२. सेवक
२३. मृत्यू नसलेला
२४. बातमी
२५. उत्तरदायित्त्व, जोखीम
२७. किरकोळ सामान
३०. भार, बोजा
३१. शेवटचा पांडव
३३. गाडीचे छत
३५. विजार
३६. वरपांगी
३८. वटवट, त्रास
३९. पदर
४१. दरवाजा
४२. आरोप
४३. सवय, उत्तर दिशा
४४. देवाण-घेवाण
४८. आस, अक्ष
४९. बडबड्या
५०. प्रेत
५२. निवासस्थान
५३. सर्वांना सारखे प्रमाण
५५. रेचक
५६. वागणूक
५७. किंमत
५८. नवीन आलेला
६०. लहानच्या विरुद्ध
६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६२. दिवसभराचे एकूण काम
६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला?
६६. भांडण
६७. मस्ती, जोम
६८. पोते शिवण्याची जाड सुई
६९. खोदकाम
७१. पोपट
७३. सैन्याचा दाणागोटा
७४. वाळवी, उणीव
७५. अनौपचारिक सहभोजन

## उभे शब्द

१. रम्य
२. बाजार
३. बंगाली रुपाया
४. घर सोडून निघून जाणे
५. मावळ्यांची युद्धातील घोषणा
६. मर्यादा
७. स्थिती, दशा
८. वस्त्र, कापड
११. मध्यम प्रमाण
१३. ’--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का’
१५. सह, सोबत
१७. थापा मारणारा
२०. आवाजातील घोगरेणा
२१. सज्ज
२२. मोठा भाऊ
२४. धडपड, प्रयत्न
२५. आजूबाजूला
२६. पावाचा गोल प्रकार
२८. धडक
२९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा
३१. संतोष आनंद
३२. आशीर्वाद
३४. अंदाज, तर्क
३७. नवरदेव
४०. चटकन
४२. सजावट
४४. अवडंबर, धैर्य
४५. उंबरठा
४६. सचिव, मुख्य
४७. किंमत
४८. अंब्याचे मिष्टान्न
४९. चणचण, न्यूनता
५१. मुलगा किंवा मुलगी
५३. चांगली वागणूक
५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ.
५५. धनको
५९. मरेपर्यंत
६०. मोजणी
६१. हास्याचे पीक
६३. सुसर
६४. उत्सव
६५. फुलातील पुंकेसर
७०. पुरुष
७२. वैताग (ला.)

## आडवे उत्तर

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान
९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास
१४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत
२२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी
२७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप
३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव
४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान
४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम
५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर
५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज
६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण
६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर
७५.अंगतपंगत

## उभे उत्तर

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग
५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था
८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर
१७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा
२४.खटपट २५.जवळपास
२६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ
३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ
३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव
४५.दारवठा
४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस
४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन
५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात
६०.मोजदाद ६१.खसखस
६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर
७२.वात




## थोडक्यात/ संक्षिप्त

### विजय हजारे ट्रॉफी:रोहित शर्मा शिवाय मुंबईचा वादळी विजय

मुंबई-विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईने छत्तीसगडचा पराभव करून विजयाची हॅट्रिक केली आहे. मुंबईचा कर्णधार शार्दुल ठाकूरने नव्या बॉलने धमाका केला, त्यानंतर शम्स मुलानीच्या स्पिनची जादू चालली, त्यामुळे छत्तीसगडचा १४२ रनवर ऑलआऊट झाला. या आव्हानाचा पाठलाग मुंबईने १५६ बॉल शिल्लक असतानाच केला. मुंबईने हा सामना ९ विकेटने जिंकला. याआधीच्या दोन सामन्यांमध्ये रोहित शर्मा मुंबईच्या टीममध्ये होता, पण छत्तीसगडविरुद्धच्या सामन्यात मुंबई रोहित शर्माशिवायच मैदानात उतरली.या सामन्यात मुंबईने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर कर्णधार शार्दुल ठाकूरच्या बॉलने आग ओकली. फास्ट बॉलरना मदत करणाऱ्या या खेळपट्टीचा शार्दुलने पुरेपुर फायदा उचलला. पहिल्याच ओव्हरमध्ये शार्दुलने २ विकेट घेतल्या, त्यानंतर पुढच्या २ ओव्हरमध्ये त्याने आणखी २ विकेट मिळवल्या, त्यामुळे छत्तीसगडची टॉप ऑर्डर कोसळली. शार्दुलने ३ ओव्हरमध्येच ४ विकेट घेतल्या होत्या.

### ऑस्ट्रेलिया टी २० वर्ल्ड कपसाठी लवकरच संघ जाहीर करण्याची शक्यता

नवी दिल्ली-भारत आणि श्रीलंका यांच्याकडून टी २० वर्ल्ड कपचं आयोजन केलं जाणार आहे. या टी २० वर्ल्ड कपसाठी भारताचा संघ जाहीर झालेला आहे. या वर्ल्डकपची सुरुवात ७ फेब्रुवारीपासून होणार आहे. ऑस्ट्रेलियाकडून लवकरच टी २० वर्ल्ड कपसाठी संघ जाहीर केला जाऊ शकतो. विशेष बाब म्हणजे, ऑस्ट्रेलिया गेल्या टी २० वर्ल्ड कपनंतर एकही आंतरराष्ट्रीय टी २० सामना न खेळलेल्या पॅट कमिन्सला संघात स्थान देण्याची शक्यता आहे. तर, जोश हेजलवूड आणि टीम डेविडला देखील भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या वर्ल्डकपसाठी संधी दिली जाऊ शकते.पॅट कमिन्स दुखापतग्रस्त असल्यानं तो बराच काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. कमिन्सच्या कमरेचं स्कॅनिंग केल्यानंतर तो टी २० वर्ल्ड कपसाठी फिट आहे की नाही याचा निर्णय होईल. मात्र, जोश हेजलवूड आणि टिम डेविड देखील फिट नाहीयेत मात्र, त्यांना संघात स्थान दिलं जाऊ शकतं.
टिम डेविड बिग बॅश लीग म्हणजे बीबीएलमधून बाहेर गेला आहे. मात्र, तो टी २० वर्ल्ड कपपर्यंत फिट होऊ शकतो. यामुळं त्याला प्रोव्हिजनल संघत स्थान मिळू शकतं.

### न्यूझीलंडविरुद्ध वनडेतून ३ स्टार खेळाडूंचा पत्ता कट ? दिग्गजांचे कमबॅक ?

मुंबई-जानेवारीत न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या ३ सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी बीसीसीआय लवकरच संघाची घोषणा करणार आहे. खराब फॉर्म आणि वाढत्या स्पर्धेमुळे ऋषभ पंतसह तीन महत्त्वाच्या खेळाडूंना संघातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यांच्या जागी घरगुती क्रिकेट पिचवर धावांचा पाऊस पाडणाऱ्या खेळाडूंचे संघात पुनरागमन होणार असल्याचे समजते. निवड समिती सध्या काही कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. यामुळे ऋषभ पंत, तिलक वर्मा आणि ध्रुव जुरेल या तीन स्टार खेळाडूंचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे. ऋषभ पंत हा कसोटीत चमकला तरी वन डे तील त्याची कामगिरी निराशाजनक आहे. श्रेयस अय्यर आणि केएल राहुल यांच्या पुनरागमनामुळे मधल्या फळीत खेळणाऱ्या तिलकला बसावे लागेल असे दिसते. संघासाठी यष्टीरक्षक निश्चित असल्यामुळे ध्रुव जुरेलला संघाबाहेर राहावे लागण्याची शक्यता आहे. हार्दिक पांड्या: पूर्णपणे तंदुरुस्त असलेला हार्दिक पांड्या अष्टपैलू खेळाडू म्हणून पुन्हा वनडे जर्सीत दिसणार आहे.ईशान किशन: घरगुती क्रिकेट आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये ऐतिहासिक फलंदाजी करणाऱ्या ईशान किशनने यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून आपला दावा मजबूत केला आहे.श्रेयस अय्यर: दुखापतीमुळे बाहेर असलेला अय्यर बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सराव करत असून, तो निवडीसाठी उपलब्ध असणार आहे.
भारत विरुद्ध न्यूझीलंड वनडे वेळापत्रक
११ जानेवारी २०२६: पहिली वनडे (वडोदरा)
१४ जानेवारी २०२६: दुसरी वनडे (राजकोट)
१८ जानेवारी २०२६: तिसरी वनडे (इंदूर)
भारत विरुद्ध न्यूझीलंड टी२० मालिकेसाठीचा संभाव्य १५ खेळाडूंचा संघ-भारतीय संघ (संभाव्य १५) : शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, अभिषेक शर्मा, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या (उपकर्णधार), रिंकू सिंग, ईशान किशन (यष्टीरक्षक),सूर्यकुमार यादव यांच्याकडे धुरा असेल.

## भारतीय महिला संघाचेच वर्चस्व अपेक्षित

> एकदिवसीय विश्वचषक विजेतेपदानंतरच्या पहिल्याच मालिकेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने चमकदार कामगिरी केली आहे.

# श्रीलंकेविरुद्ध आज पाचवा ट्वेन्टी-२० सामना

**मालिकेत ५-० असे निर्भेळ यश संपादन करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.**



**थिरुवनंतपुरम :** भारत आणि श्रीलंका महिला क्रिकेट संघांतील अखेरचा पाचवा ट्वेन्टी-२० सामना आज, मंगळवारी रंगणार आहे. यावेळी भारतीय संघाचेच वर्चस्व अपेक्षित असून हा सामना जिंकत मालिकेत ५-० असे निर्भेळ यश संपादन करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. एकदिवसीय विश्वचषक विजेतेपदानंतरच्या पहिल्याच मालिकेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने चमकदार कामगिरी केली आहे.
श्रीलंकेविरुद्ध पहिल्या तीन ट्वेन्टी-२० सामन्यांत धावांचा यशस्वी पाठलाग केल्यानंतर चौथ्या सामन्यात भारताला प्रथम फलंदाजी करण्याची संधी मिळाली. याचा पूर्ण फायदा घेताना भारताने २० षटकांत २ बाद २२१ धावांचा डोंगर उभारला. ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय महिला संघाची ही आजवरची सर्वोच्च धावसंख्या ठरली. स्मृती मनधाना आणि शफाली वर्मा यांनी १६२ धावांची विक्रमी सलामी दिली. शफालीने सलग तीन सामन्यांत अर्धशतक करण्याची कामगिरी केली आहे.
आता अखेरच्या सामन्यात स्मृती आणि शफाली यांच्यापैकी एकीला विश्रांती देत युवा जी. कमलिनीला आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी देण्याबाबत भारतीय संघ विचार करू शकेल. पुढील वर्षी जून-जुलैमध्ये इंग्लंड येथे होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी संघबांधणीच्या दृष्टीने या मालिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. भारतीय संघाने डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माला पदार्पणाची संधी दिली आणि तिने चमक दाखवली. तसेच वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूरनेही यशस्वी पुनरागमन केले. भरवशाची अष्टपैलू दीप्ती शर्माने लौकिकाला साजेशी कामगिरी केली. भारतासाठी या सकारात्मक गोष्टी घडल्या असल्या, तरी क्षेत्ररक्षण हा अजूनही चिंतेचाच विषय ठरत आहेत. चौथ्या सामन्यात भारताने दोन झेल सोडले, तसेच रिचा घोषने यष्टिचित करण्याची संधी वाया घालवली. त्यामुळे क्षेत्ररक्षणात सुधारणा करण्याचा भारताचा मानस असेल.वेळ : सायं. ७ वा. थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

## सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये या क्रिकेटर्सचे होणार प्रमोशन, तर रोहित विराट सह ३ दिग्गजांना बाहेरचा रास्ता



मुंबई -वर्ष २०२५ संपून नवीन वर्षाची सुरुवात होण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात वनडे सीरिज खेळवली जाणार आहे. या सीरिजला ११ जानेवारी पासून सुरुवात होणार असून त्यापूर्वी बीसीसीआय सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट बाबत समोर आलेल्या अपडेट्समुळे विराट आणि रोहितच्या फॅन्सना आश्चर्य वाटेल. दरवर्षी फेब्रुवारी - मार्च महिन्यात बीसीसीआयच्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टची घोषणा करण्यात आली होती, मात्र यंदा वर्ल्ड कप २०२६ ला फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरुवात होणार असल्याने बीसीसीआय नववर्षाच्या सुरुवातीलाच २०२६ च्या वार्षिक सेंट्रल कॉन्ट्रॅक्टची घोषणा करण्याची शक्यता आहे.
कोणाचं डिमोशन?
स्पोर्ट्स तकच्या एका रिपोर्टमध्ये सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात आलंय की टेस्ट क्रिकेट आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना यंदाच्या बीसीसीआय सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये झटका बसू शकतो. मागच्यावर्षीच्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये दोघे अ+ ग्रेडमध्ये सामील होते, मात्र यंदा या दोघांना खालच्या ग्रेडमध्ये स्थान दिले जाऊ शकते. यांच्या सोबतच जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांच्या ग्रेडमध्ये सुद्धा बदल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.
कोणाचे प्रमोशन?
टीम इंडियासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळणाऱ्या शुभमन गिलला बीसीसीआयच्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये प्रमोशन मिळू शकते. तो सध्या ग्रेड ए मध्ये सामील आहे. २०२५ मध्ये बीसीसीआयने त्याला भारताच्या टेस्ट आणि वनडे संघाचं कर्णधार बनवलंय. त्यामुळे आता २०२६ च्या बीसीसीआय कॉन्ट्रॅक्टमध्ये त्याला अ+ ग्रेडमध्ये प्रमोट केलं जाईल. ज्यामुळे त्याला वर्षाला ७ कोटी रुपये मिळतील. विराट कोहली हे एकमेव खेळाडू आहेत जे २०१८ च्या सुरुवातीपासूनच या एलीट ग्रुपचा भाग आहेत. २ खेळाडूंना दाखवणार बाहेरचा रस्ता?नव्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि मुकेश कुमार यांना बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो. स्टार गोलंदाज मोहम्मद शमी हा मागील अनेक वर्षापासून टीम इंडियाच्या बाहेर आहे तर मुकेश कुमार हा सुद्धा अनेक दिवसांपासून टीम इंडियात संधी मिळालेली नाही.
'या' खेळाडूंना प्रमोशन देण्याची तयारी :
यंदा बीसीसीआय सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये काही युवा स्टार खेळाडूंना प्रमोशन देण्याची शक्यता आहे. तिलक वर्मा, अर्शदीप सिंह, प्रसिद्ध कृष्णा, ध्रुव जुरेल आणि हर्षित राणा सारख्या खेळाडूंना प्रमोट करू शकते. अनेक संघ हे लिमिटेड ओव्हर सह टीम इंडियाच्या टेस्ट संघाचा सुद्धा भाग आहेत. नव्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये ईशान किशनला कायम ठेवलं जाण्याची शक्यता आहे. त्याचं देशांतर्गत क्रिकेटमधील दमदार प्रदर्शन पाहता टी २० वर्ल्ड कप २०२७ साठी टीम इंडियात त्याची निवड होऊ शकते.

## गौतम गंभीरच भारताचा कसोटी प्रशिक्षक राहणार

नवी दिल्ली-गौतम गंभीर भारताचा कसोटी प्रशिक्षक म्हणून कायम राहील. बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले आहे की, कसोटी संघाचा नवा प्रशिक्षक म्हणून व्हीव्हीएस लक्ष्मणशी संपर्क साधल्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आणि निराधार आहेत, बोर्डाने कसोटी संघाच्या नेतृत्त्व गटात बदल करण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सैकिया यांनी सांगितले की, ही बातमी पूर्णपणे तथ्यहीन आहे. काही प्रतिष्ठित माध्यम संस्था देखील ही बातमी चालवत आहेत, परंतु यात कोणतेही सत्य नाही. बीसीसीआय याचे थेट खंडन करते.
अलीकडच्या काळात अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की, कसोटी संघाच्या खराब कामगिरीनंतर व्हीव्हीएस लक्ष्मणला पुढील कसोटी प्रशिक्षक बनवले जाऊ शकते. भारताला मायदेशात दक्षिण आफ्रिकेकडून २-० ने कसोटी मालिका गमवावी लागल्यानंतर या अटकळी समोर आल्या. यापूर्वी न्यूझीलंडविरुद्धही संघाला ०-३ ने पराभवाला सामोरे जावे लागले होते.टेस्ट क्रिकेटमधील अलीकडील अपयशाच्या विपरीत, मर्यादित षटकांच्या सामन्यांमध्ये टीम इंडियाची कामगिरी मजबूत राहिली आहे. गौतम गंभीरच्या प्रशिक्षकपदाखाली भारताने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आशिया कप टी-२० एकही सामना न हरता जिंकले. मात्र, त्यांच्या कार्यकाळात भारताने टेस्टमध्ये ७ सामने जिंकले, १० हरले आणि २ ड्रॉ खेळले आहेत. सध्या भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान कसोटी नाही, तर टी-२० विश्वचषक आहे.

## ३ ओव्हर, ४ विकेट्स... शार्दूल ठाकूरचा कहर! टीम इंडियाचे दार पुन्हा ठोठावले, न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेत बीसीसीआय देणार संधी?

दिल्ली,२९ डिसेंबर (पीएसआय)
विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेतील तिसऱ्या फेरीचे सामने आज सोमवार २९ डिसेंबर रोजी देशभरात सुरू असून अनेक मोठ्या घडामोडींनी क्रिकेट चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. जयपूरमधील जयपुरिया विद्यालय मैदानावर खेळवण्यात आलेल्या सामन्यात मुंबई संघाने चंदीगडविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यात मुंबईचा अष्टपैलू खेळाडू आणि कर्णधार शार्दुल ठाकूरने छत्तीसगडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. शार्दुल ठाकूर घातक फॉर्ममध्ये दिसला आणि त्याने अवघ्या ५ षटकांत केवळ १३ धावा देत ४ महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. त्याच्या माऱ्यामुळे छत्तीसगड संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली.शार्दुल ठाकूरने छत्तीसगडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले छत्तीसगडने पहिल्या १० षटकांतच ४ विकेट्स गमावत केवळ ३४ धावा केल्या असून संघावर मोठे संकट ओढावले आहे. शार्दुलच्या या झंझावाती गोलंदाजीमुळे मुंबई संघ सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवताना दिसत आहे.



विजय हजारे ट्रॉफीतील पुढील सामन्यांमध्येही अशाच थरारक लढती पाहायला मिळण्याची अपेक्षा क्रिकेट चाहत्यांना आहे.
शार्दुल ठाकूरला न्यूझीलंडविरुद्ध वनडे मालिकेत संधी मिळणार?
हा प्रश्न सध्या क्रिकेट वर्तुळात जोरदार चर्चेत आहे. विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ मध्ये शार्दुल ठाकूरने पुन्हा एकदा सिद्ध केले आहेत आणि टीम इंडियाचं दार पुन्हा ठोठावले आहे. न्यूझीलंडविरुद्ध येणाऱ्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी ँण्ध काही वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्याचा विचार करत असल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत अष्टपैलू गोलंदाज म्हणून शार्दुल ठाकूर हा एक मजबूत पर्याय ठरू शकतो. याशिवाय २०२७ वनडे वर्ल्ड कपच्या दृष्टीने ँण्ध बेंच स्ट्रेंथ मजबूत करण्यावर भर देत आहे. विजय हजारेसारख्या देशांतर्गत स्पर्धातील कामगिरीला पुन्हा महत्त्व दिलं जात असल्याने शार्दुलसारख्या खेळाडूंसाठी ही मोठी संधी आहे.
विराट कोहली आणि रोहित शर्मा आज खेळणार नाहीत... मात्र, आजच्या सामन्यांमध्ये चाहत्यांना विराट कोहली आणि रोहित शर्मा हे दोन दिग्गज खेळाडू मैदानात दिसणार नाहीत, ही बाब थोडी निराशाजनक ठरली. रोहित शर्मा स्पर्धेतील पहिल्या दोन सामन्यांसाठी उपलब्ध होता, तर विराट कोहली दिल्ली संघात ६ जानेवारी रोजी रेल्वेविरुद्ध होणाऱ्या सामन्यासाठी संघात सामील होणार आहे. हे दोन्ही स्टार खेळाडू ११ डिसेंबरपासून न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज होत असल्याने त्यांना विश्रांती देण्यात आली आहे.मुंबई संघाची प्लेइंग इलेव्हन : ंगकृष्ण रघुवंशी, मुशीर खान, सरफराज खान, सिद्धेश लाड, हार्दिक तामोरे (यष्टीरक्षक), शम्स मुलाणी, इशान मुलचंदानी, शार्दुल ठाकूर (कर्णधार), तनुष कोटियन, तुषार देशपांडे, ओंकार तुकाराम तरमले.छत्तीसगड संघाची प्लेइंग इलेव्हन : अनुज तिवारी, आशुतोष सिंग, मयंक वर्मा (यष्टीरक्षक), संजीत देसाई, अमनदीप खरे (कर्णधार), अजय जाधव मंडल, मोहित राऊत, हर्ष यादव, आदित्य सरवटे, रवी किरण, सौरभ मजुमदार.

## ४ ओव्हरमध्ये घेतल्या ८ विकेट

नवी दिल्ली-क्रिकेटचा खेळ हळूहळू जगभरात पसरत आहे. अधिकाधिक क्रिकेट सामने खेळले जात आहेत, ज्यामुळे दररोज नवीन विक्रम मोडले जात आहेत. भूतान आणि म्यानमार यांच्यात एक टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला, ज्यामध्ये भूतानने ८२ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भूतानने १२७ धावा केल्या. त्यानंतर म्यानमारचा संघ फक्त ४५ धावांवर बाद झाला. भूतानकडून सोनम येशेने शानदार गोलंदाजी केली आणि सामन्यात एकूण ८ विकेट्स घेतल्या.
भूतानच्या सोनम येशेने घेतल्या ८ विकेट्स : २२ वर्षीय सोनम येशेनं म्यानमारविरुद्धच्या टी-२० सामन्यात चार षटकांत ७ धावा देत ८ विकेट्स घेतल्या. त्याची गोलंदाजी म्यानमारच्या फलंदाजांसाठी कठीण ठरली. तो टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनला आणि एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला. सोनम येशेच्या आधी, पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात फक्त दोन गोलंदाजांनी प्रत्येकी सात विकेट्स घेतल्या होत्या. २०२३ मध्ये चीनविरुद्धच्या टी-२० सामन्यात मलेशियाच्या सयाजरुल इद्रुसनं सात विकेट्स घेतल्या. तर बहरीनच्या अली दाऊदने भूतानविरुद्धच्या टी-२० सामन्यात सात विकेट्स घेतल्या. आता, सोनमने उल्लेखनीय कामगिरी करून या दोन्ही गोलंदाजांना मागे टाकले आहे.भूतानकडून नामगांग चेजेचे अर्धशतक : भूतानकडून नामगांग चेजेनं सामन्यात चांगली फलंदाजी केली. त्याने ४५ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकारासह एकूण ५० धावा केल्या. नंतर नामगाय थिनलेनं २२ चेंडूत २७ धावांचं योगदान दिलं.

# स्मृती मानधनाची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विक्रमी झेप

**मुंबई :** भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामन्यात स्मृती मानधनाने २७ धावा पूर्ण करताच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावा करण्याचा पल्ला गाठला आहे. यासह तिच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.
भारतीय संघाची सलामीवीर फलंदाज स्मृती मानधना ही भारतीय फलंदाजीतील कणा म्हणून ओळखली जाते. डावाची सुरुवात करताना तिने अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये मोठी खेळी केली आहे. अखेर तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावा करण्याच्या विक्रमात दिग्गज खेळाडूंच्या यादीत प्रवेश केला आहे. असा पराक्रम करणारी ती जगातील चौथी फलंदाज ठरली आहे. तर सर्वात जलद १० हजार धावांचा पल्ला गाठणारी महिला फलंदाज ठरली आहे.
स्मृती मानधनाने आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील २८ व्या सामन्यात १० हजार धावांचा पल्ला गाठला आहे. या यादीत भारताची माजी कर्णधार मिताली राज अव्वल स्थानी आहे. मिताली राजच्या नावे ३१४ डावांत १०८६८ धावा करण्याची नोंद आहे. तर दुसऱ्या स्थानी असलेल्या सुजी बेट्सच्या नावे ३४३ डावांत १०६५२ धावा करण्याची नोंद आहे. तर तिसऱ्या स्थानी असलेल्या सी एडवर्ड्सच्या नावे ३१६ डावांत १०२७३ धावा करण्याची नोंद आहे.
स्मृती-शफालीची वादळी खेळी
भारताचे श्रीलंकेसमोर २२२ धावांचे विशाल लक्ष्य तिरुवनंतपुरम (वृत्तसंस्था) : भारतीय महिला क्रिकेट संघाने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात ...
आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावा करणारे फलंदाज
मिताली राज (भारत) -१०,६६८ धावा, ३१४ डावांत
सुजी बेट्स (न्यूझीलंड) - १०६५२ धावा , ३४३ डावांत
सी एडवर्ड्स (इंग्लंड) - १०२७३ धावा, ३१६ डावांत
स्मृती मानधना (भारत) - १०,००० धावा, २८० डावांत तिरुवनंतपुरम (वृत्तसंस्था) : भारतीय महिला क्रिकेट संघाने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात फलंदाजीचा फॉर्म दाखवत निर्धारित २० षटकांत २ बाद २२१ धावांचा डोंगर उभा केला आहे. तिरुवनंतपुरमच्या ग्रीनफिल्ड स्टेडियमवर भारतीय सलामीवीरांनी श्रीलंकन गोलंदाजीची अक्षरशः पिसे काढली आणि श्रीलंकेसमोर विजयासाठी २२२ धावांचे कठीण आव्हान दिले.
सलामीवीर स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी मैदानात चौफेर फटकेबाजी केली. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल १६२ धावांची विक्रमी भागीदारी केली. ही भारतासाठी महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी ठरली आहे. या सामन्यात श्रीलंकेच्या महिला संघाने नाणेफेक जिंकली होती आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. स्मृती मानधनाने पहिल्याच ओव्हरमध्ये २ चौकार लगावत भारतीय संघाला सकारात्मक सुरुवात करून दिली होती. तसेच तिला साथ देत शफाली वर्माच्या तडाखेबंद फटकेबाजीच्या जोरावर भारतीय संघाने ११व्या षटकातच शंभरीचा टप्पा ओलांडला आहे.स्मृती मानधनाने ३५ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. भारतासाठी सर्वाधिक षटकारांचा विक्रमही तिने नावावर केला. स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांच्या वादळी खेळींच्या बळावर भारतीय संघाने दीडशेचा टप्पा ओलांडला. दरम्यान शफालीबरोबरीची भागीदारी संपुष्टात येताच स्मृती मानधनाही बाद झाली आहे. स्मृतीने ४८ चेंडूत ८० धावांची खेळी केली. स्मृतीने ४८ चेंडूंत ८० तर शफालीने ४६ चेंडूत ७९ धावांची खेळी केली. तर ऋचा घोषने या पायावर कळस चढवत १६ चेंडूंत ४० धावा आणि कर्णधार हरमनप्रीत कौरने १० चेंडूंत १६ धावा केल्या. मालिका विजयाकडे वाटचाल : पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत आधीच ३-० ने आघाडीवर आहे. आता श्रीलंकेसमोर विजयासाठी २२२ धावांचे कठीण आव्हान होते. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी प्रति षटक ११.१० च्या धावगतीने फलंदाजी करावी लागणार होती. ऋचा घोषचा फिनिशिंग टच : सलामीवीर बाद झाल्यानंतर रिचा घोषने शेवटच्या षटकांत आपली फटकेबाजी सुरू ठेवली. तिने केवळ १५ चेंडूंत नाबाद ३९ धावा कुटून भारताला २२० चा टप्पा पार करून दिला. कर्णधार हरमनप्रीत कौरने ५ धावा करून नाबाद राहिली.



# लातूरच्या बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ची उद्योगजगतात गरुडझेप

## जिद्द, गुणवत्ता आणि आधुनिकतेच्या जोरावर आयपीओपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

**लातूर/प्रतिनिधी :** माणसाकडे जिद्द, चिकाटी आणि भविष्याचा वेध घेणारी दृष्टी असेल, तर सामान्य माणूसही असामान्य कामगिरी करू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मूळचे लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील कोष्टगाव येथील रहिवासी स्व. पांडुरंगजी मुंदडा व स्व. फुलाबाई मुंदडा या दांपत्याने दिलेल्या संस्कारातून उभा राहिलेला उद्योगसमूह आज संपूर्ण उद्योगविश्वाचे लक्ष वेधून घेत आहे.

स्व. फुलाबाई यांच्या नावावरून स्थापन झालेल्या ''बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि.'' या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओ धारक कंपनी होण्याचा मान पटकावला आहे. ही यशस्वी झेप नवोदित उद्योजकांसाठी कायमस्वरूपी प्रेरणादायी ठरत आहे.

**छोट्या व्यवसायाचे वटवृक्षात रूपांतर**

मुंदडा कुटुंबाने सुरुवातीला विविध क्षेत्रांमध्ये व्यवसाय उभारले. त्यामध्ये आनंद मिल्क एजन्सीज, मुंदडा फुड्स, येडेश्वरी आईस फॅक्टरी, येडेश्वरी पॅकेजिंग इंडस्ट्रीज, गोल्ड जिम, मुंदडा पॉलिमर्स, बाईकाकाजी इंडस्ट्रीज, बाईकाकाजी अक्का शुअर आणि अखेरीस बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि. यांचा समावेश आहे. आईच्या निधनानंतर सर्व व्यवसायांना एकत्रित करत ''बाईकाकाजी उद्योग समूह'' हे नाव देण्यात आले.

**सनरीच एक्काचाही होतोय झपाट्याने विस्तार**

बाई - काकाजी उद्योग समूहाच्या सनरीच मिनरल वॉटरने आपल्या उत्पादनात सुरुवातीपासूनच एक उच्च दर्जा कायम ठेवला आहे. महाराष्ट्रासोबतच हे उत्पादन आता देशाच्या अनेक राज्यातील ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. आरोग्यासाठी आवश्यक आणि पूरक असणारे घटक सनरीच मिनरल वॉटरमध्ये मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे अल्पावधीतच या उत्पादनाने आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावण्याचे काम केले आहे. भविष्यात हे उत्पादन यापेक्षाही अधिक वेगाने ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास आहे. गुणवत्तेच्या बाबतीत कधीही तडजोड न करण्याच्या धोरणामुळेच सनरीच एक्काचाही झपाट्याने विस्तार होतो आहे.

**दर्जेदार उत्पादन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान**

पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या व शीतपेयांसाठी आवश्यक असणारे सर्व आकारांचे प्री-फॉर्म व कॅप क्लोजर उच्च दर्जाच्या प्लास्टिकपासून तयार केले जातात. यासाठी जर्मनी, जपान, इटली तसेच भारतातील अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जातो. गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.





**पर्यावरणपूरक दृष्टिकोन**

औद्योगिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय जबाबदारी जपत कंपनीने ५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारला असून, त्यामुळे विद्युत खर्चात लक्षणीय बचत झाली आहे. गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी ही कंपनीची प्रमुख मूल्ये आहेत.

**भव्य कार्यक्षेत्र आणि नामांकित ग्राहक**

आज कंपनीचे कामकाज सुमारे ३३ हजार चौरस मीटर एवढ्या भव्य परिसरात चालते. आयआरसीटीसी (इंडियन रेल्वे), रिलायन्स कॅम्पा कोला, पार्ले बेली, पतंजली, टाटा वॉटर, सनरीच यांसारख्या नामांकित कंपन्या बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि. च्या ग्राहकांमध्ये आहेत, याचा कंपनीला विशेष अभिमान आहे.

या यशस्वी वाटचालीत साडेतीनशेहून अधिक कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

**आयपीओपर्यंतची ऐतिहासिक झेप**

बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने औद्योगिक क्षेत्रात आयपीओपर्यंत यशस्वी मजल मारली आहे. पहिल्या टप्प्यात १०५ कोटी रुपयांची शेअर विक्री करून आर्थिक गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.

कंपनीचा आयपीओ शेअर बाजारात दि. २३ ते २६ डिसेंबर २०२५ या कालावधीत खुला होता, तर ३१ डिसेंबर २०२५ रोजी कंपनीची यशस्वी लिस्टिंग होत आहे, ही लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**भविष्याकडे आशावादी वाटचाल**

भविष्यात याहून अधिक प्रगती साधत, गुंतवणूकदारांचा विश्वास कायम ठेवून उद्योगसमूहाची यशस्वी वाटचाल सुरू ठेवण्याचा निर्धार बाईकाकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने व्यक्त केला आहे.

# निकोप समाज व्यवस्था निर्मितीसाठी लैंगिक अत्याचाराच्या घटना रोखणे आवश्यक

## बाल लैंगिक अत्याचार कायदा प्रशिक्षणात माधव गादेकर यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :**सध्याचे बालक म्हणजे आपल्या भारत देशाला घडवणारी पिढी, त्यांचे जीवन जेवढे सुरक्षित आणि प्रगतशील राहील तेवढा देश शाश्वत विकासाकडे वाटचाल करील परंतु सध्या बालकावर होणारे लैंगिक अत्याचाराच्या घटना लक्षात घेता बालकांचे जीवन आव्हानात्मक झाले आहे तेव्हा बालका वरील होत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटना रोखून निकोप समाज व्यवस्थेकडे वाटचाल करण्याची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत माजी प्राचार्य माधव गादेकर यांनी कलापंढरी संस्था लातूर व क्राय संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना केले.



आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक रामकृष्ण सम्मुखराव होते तर उद्घाटक म्हणून जेष्ठ विचारवंत माजी प्राचार्य माधव गादेकर होते ,तर पाहुणे म्हणून पानगाव केंद्राचे केंद्रप्रमुख गौतम टाकळीकर ,कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी,आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून बालन्याय मंडळाच्या सदस्य सौ.ॲड छाया मलवाडे यांची उपस्थीती होती.

पुढे बोलताना गादेकर म्हणाले की सामान्य व दुर्बल घटकांना कायदेशीर आधार मिळणे फार महत्त्वाचे आहे यासाठी आवश्यक कायद्याची गाव पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रबोधन झाले पाहिजे या उद्देशानेच कला पंढरी संस्थेने बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ या महत्त्वाच्या कायद्यावर कार्यकर्ता प्रशिक्षण आयोजित केली आहे या प्रशिक्षणातून तयार झालेली कार्यकर्ते गाव पातळीवर हजारो लोकांना प्रबोधन करण्याचे कार्य करतील. कलापंढरी संस्था समाजामध्ये निर्माण होणाऱ्या अनेक आव्हानात्मक बाबीवर समाजात प्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे .अशा पद्धतीचे कार्य जिल्ह्यातील इतर सामाजिक संस्थांनी ही सक्रियपणे करावे असे आवाहन त्यांनी केले.

या नंतर या कार्यक्रमाच्या मुख्य प्रशिक्षक म्हणून ॲड छाया मलवाडे यांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ संदर्भात सविस्तर माहीती दिली, या वेळी या कायद्याची प्रास्तावना,बालकांची व्याख्या,कायद्या विषयी महत्वाच्या बाबी ,पोस्को कायद्या अंतर्गत येणाऱ्या बाबी,लैंगिक छळ, लैंगिक अत्याचार,प्रवेशाच्या लैंगिक अत्याचार,गंभीर स्वरुपाचे लैंगिक अत्याचार, अश्लिल साहीत्य वापरणे आदी विषया सह गुन्ह्यांच्या स्वरुपावरुन शिक्षेची तरतुद या विषयी देखील महत्वाची माहीती दिली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत बी पी सुर्यवंशी यांनी गावपातळीवर आसलेल्या बालसंरक्षणाच्या व त्या अनुसंघाने आसलेल्या सर्व यंञणा सक्रीय व्हाव्यात व त्यांना या कायद्याची पुर्ण माहीती मिळावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याने सांगीतले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज पवार, जयवंत जंगापल्ले,मधुकर गालफाडे,फरहाना शेख,सुप्रिया रामदासी आदींनी परिश्रम केले.कार्यक्रमासाठी रेणापुर ,चाकूर तालूक्यातील अनेक गावातून शिक्षक,शालेय समिती,ग्राम बाल संरक्षण समिती पदाधिकारी,तसेच आशाताई,अंगणवाडी कार्यकर्ती आदींची उपस्थिती होती.

# स्व. शिवराज पाटील चाकूरकर स्थितप्रज्ञ नेतृत्व- सहकार मंत्री पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर चे सुपुत्र लोकनेते शिवराज पाटील चाकूरकर हे एक स्थितप्रज्ञ नेतृत्व होते. चाकूरसह संपूर्ण देश लोकनेतृत्वाला मुकला असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना .बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले. चाकूर येथे चाकूरकरांच्यावतीने लोकनेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.



यावेळी पुढे बोलताना नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की माणसाची किंमत असताना आपल्याला नसते ती गेल्यावर असते. शिवराज पाटील साहेबांना काम करण्याची हातोटी होती. त्यांनी विविध क्षेत्रात काम केले. चाकूरची विविध प्रशासकीय कार्यालय एकत्रित असावी अशी त्यांची भूमिका होती. यांच्या नेतृत्वात बाळासाहेब जाधव साहेब व मलाही काम करता आलं. शिवराज पाटील साहेब यांचे देशातल्या सर्व भाषावर कमांड होत. त्यांचे अध्यात्मावर मोठ्या प्रमाणात पगडा होता. त्यांचे आचार विचार जर आपण आत्मसात करून आपण राजकारण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना खऱ्या अर्थाने आपण श्रद्धांजली वाहिल्यासारखी होईल अशा भावना राज्याचे सहकार मंत्री नामदार पाटील यांनी व्यक्त केल्या.

या शोक सभेची सुरुवात शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या शोकसभेत माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, सर्वोत्तमराव कुलकर्णी, विठ्ठल माकणे, विलासराव पाटील चाकूरकर, नगराध्यक्ष करीम गुळवे, विनायकराव पाटील, गणेश हाके, बब्रुवान खंदाडे, प्राध्यापक बी मी मोतीपवळे ,एडवोकेट संभाजीराव पाटील, बसवराज पाटील मुरूमकर, व माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी मनोगत व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी पाटील चाकूरकर यांनी केले.

श्रद्धांजली सभेस चाकूरकर परिवाराच्या वतीने शैलेश पाटील चाकूरकर, नरेश पाटील चाकूरकर, विलासराव पाटील चाकूरकर, मोहनराव पाटील चाकूरकर, रुद्राली पाटील चाकूरकर, ऋषिका पाटील चाकूरकर चाकुरकर परिवारातील विविध सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक राजेश तगडपल्लेवार, प्रमोद हुडगे यांनी केले. कार्यक्रमास चाकुर शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षांसाठी ऑनलाईन गृहपाठ सादरीकरणास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

नाशिक (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा दिनांक ०७ जानेवारी २०२६ पासून सुरू होत आहेत. जानेवारी व जुलै सत्रात प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन गृहपाठ सादर करण्यास बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.





विद्यार्थ्यांना त्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन / अंतर्गत मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असलेले गृहपाठ ऑनलाईन अपलोड करण्याची कार्यप्रणाली विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार परीक्षा विभागाने विकसित केलेली आहे. विद्यार्थ्याने आपल्या कायम नोंदणी क्रमांकाच्या (पीआरएन) आधारे लॉगीन करून, विषयनिहाय वैयक्तिक माहिती असलेली उत्तरपुस्तिका डाऊनलोड करून या उत्तरपुस्तिकेमध्ये असलेल्या गृहपाठाचे प्रश्न आपल्या हस्ताक्षरामध्ये लिहून त्या पीडीएफ स्वरुपात पोर्टलवर विषयनिहाय अपलोड करायच्या आहेत. मुदतीत गृहपाठ सादर न करणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयात अनुपस्थित दर्शवून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ०८०७११८८७८९, ८००७२५३०४४, ८०५५२५३०७२ या मदत क्रमांकावर संपर्क साधावा. ऑनलाईन गृहपाठ सादरीकरणासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना, कार्यपद्धती तसेच संबंधित शिक्षणक्रमांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://asm.ycmou.org.in उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत गृहपाठ सादर करून सूचनांचे पालन करावे, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# महावितरणच्या ऑनलाईन सेवेमुळे ग्राहकांना सुविधा, ५८ हजार ग्राहकांना नाव बदलाचा तर १० हजार ग्राहकांना भारवाढीचा लाभ

**मुंबई/प्रतिनिधी :** दि. २९ डिसेंबर २०२५ - वीज कनेक्शनच्या नावात बदलाच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याची सुविधा महावितरणने सुरू केल्यानंतर राज्यातील वीज ग्राहकांना त्याचा मोठा लाभ झाला असून दोन महिन्यात ५८,१६७ ग्राहकांनी घरबसल्या नावात बदल (चेंज ऑफ नेम) करून घेतला. त्याचसोबत वीज ग्राहकांना मंजूर भार वाढवून घेण्यासाठी सुरू केलेल्या सुविधेचा १०,४२८ ग्राहकांना लाभ झाला आहे.



जीवनसुलभतेसाठी (ईज ऑफ लिव्हिंग) महावितरणने वीज ग्राहकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन द्याव्यात जेणेकरून वीज ग्राहकांना घरबसल्या सुविधांचा लाभ घेता येईल व त्यांना कार्यालयात जावे लागणार नाही, असा प्रयत्न चालू आहे. त्यानुसार महावितरणने वीज कनेक्शन नावात बदल आणि मंजूर भार बदल यासाठी ऑनलाईन व झटपट सुविधा उपलब्ध केली आहे.

खरेदी - विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप अथवा www.mahadiscom.in या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करता येतो. ग्राहकाला कोणत्या कारणासाठी नाव बदलणे आवश्यक आहे त्याचा पर्याय निवडला की, त्यानुसार आवश्यक ते निवडक दाखले जोडावे लागतात. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर तीन ते सात दिवसात नावातील बदलाची प्रक्रिया पूर्ण होते.

महावितरणने लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. या सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांची संख्या आता १०,४२८ झाली आहे व त्यांनी ६९.३७ मेगावॅट भार वाढवून घेतला आहे. अस्तित्त्वात असलेल्या जोडणीच्या वीजभारामध्ये (Load Change/Demand Change) वाढ करणे किंवा कमी करण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर ग्राहकांना उपलब्ध आहे.

वीज भार वाढीबाबत ऑनलाइन मागणी नोंदविल्यानतंर संबंधित ग्राहकांना स्वयंचलित पद्धतीने कोटेशन देण्यात येते. वीजग्राहकांनी आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर नवीन मीटर बसविण्याची किंवा पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याची गरज नसेल अशा वीजजोडणीचा वाढीव वीज भार स्वयंचलित प्रणालीने मंजूर होतो व केवळ २४ तासांत कार्यान्वित होतो. वाढीव वीजभाराच्या आवश्यकतेनुसार किंवा सिंगलऐवजी थ्री फेजची मागणी असल्यास नवीन मीटर लावण्यात येतो. अशा ठिकाणी नवीन वीज मीटर लावण्याचा आदेश स्वयंचलितपणे संबंधित एजन्सीला देण्यात येतो. नवीन वीजमीटरची आवश्यकता असलेल्या ठिकाणी देखील साधारणतः ४८ तासांमध्ये वीज भार वाढीची प्रक्रिया पूर्ण होते.

लघुदाब वर्गवारीमध्ये वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजूरी देण्याच्या निर्णयामुळे प्रामुख्याने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी घरगुती ग्राहकांना तसेच प्रामुख्याने औद्योगिक, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहकांना मोठा लाभ होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूरच्या पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे या जिद्दीने कामाला लागावे

## नवनियुक्त भाजपा पदाधिकाऱ्यांना युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** देशात आणि राज्यात भाजपाची सत्ता असून शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी लातूर पंचायत समितीवर भाजपाचाच झेंडा फडकला पाहिजे यासाठी भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांसह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी कार्यरत राहावे अशा सूचना भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केल्या.

भारतीय जनता पार्टी लातूर मंडल कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांसह भाजपा युवा मोर्चा, अनुसूचित जाती जमाती मोर्चा, ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त पावणे दोनशे पदाधिकाऱ्यांना युवा नेते



ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात वितरण करण्यात आले. यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, मंडलाचे युवा मोर्चा अध्यक्ष प्रशांत शिंदे, अमर चव्हाण, अनुसूचित जाती मोर्च्याचे अध्यक्ष मारुती शिंदे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष शंकर चव्हाण यांच्यासह आदिनाथ मुळे, संजय ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याला मान सन्मान आहे, इतर लोकप्रतिनिधी एवढाच भाजपाचा बूथ प्रमुख ही तोला मोलाचा असल्याचे सांगून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, गेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदार संघात युवा मोर्चाच्या तरुणांनी विशेष काम केले असल्याचा उल्लेख करून येणाऱ्या निवडणुकीत जिल्हा परिषद भाजपाच्या ताब्यात येणार असून लातूर पंचायत समितीवर ही भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे याच जिद्दीने सर्व कार्यकर्त्यांनी काम करावे असे बोलून दाखवले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदाला न्याय द्यावा केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ गरजूंना मिळावा यासाठी प्रयत्न करावेत. लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड साहेबांनी प्रत्येक गावागावात मोठ्या प्रमाणात विकास निधी दिला अनेक विकासाची कामे केली मात्र आपण केलेली कामे सांगायला कमी पडत आहोत तेंव्हा भाजपाच्या तरुण कार्यकर्त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सक्रिय व्हावे असेही आव्हान युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी केले.

प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी प्रास्ताविक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी शंकर चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रमास लातूर तालुक्यातील भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री केशवराज माध्यमिक विद्यालयास खोलेश्वर विद्यालय दिंद्रुडच्या शिक्षकांची सदिच्छा भेट



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयास दि. २९ डिसेंबर २०२५ सोमवार रोजी खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड, तालुका माजलगाव, जिल्हा बीड येथील शिक्षकांनी सदिच्छा भेट दिली. श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचा महाराष्ट्रात असलेला नावलौकिक, येथील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, दहावी बोर्ड परीक्षेत महाराष्ट्रातून १०० टक्के गुण घेणारे सर्वात जास्त विद्यार्थी असणारी शाळा, शाळेतील मूल्यमापन विभाग, दहावी विभाग, शालाबाह्य परीक्षा विभाग, अभ्यासपूरक मंडळांतर्गत घेण्यात येणारे उपक्रम-कार्यक्रम, दैनंदिन शालेय कामकाज, सर्व विषयांचे अध्यापन, शालेय गुणवत्ता वाढीसाठी केले जाणारे प्रयत्न यांविषयी जाणून घेण्यासाठी खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील शिक्षकांनी केशवराज विद्यालयास सदिच्छा भेट दिली.

याप्रसंगी विद्यालयातील मराठी विषय शिक्षिका सुलक्षणा गंगथडे, हिंदी विषय शिक्षिका रेणुका गिरी, दहावी विभाग प्रमुख तसेच इंग्रजी विषय शिक्षिका अर्चना ठोंबरे, गणित विषय शिक्षक आदिनाथ कदम, विज्ञान विषय शिक्षक शाम अंदुरे, प्रदीप कटके व सामाजिक शास्त्र विषय शिक्षक प्रल्हाद माले यांनी या विषयांच्या गुणवत्ता वाढीसाठी विद्यालयास भेट देण्यात आलेल्या या सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे आपले मत व्यक्त करताना असे म्हणाले, की केशवराज विद्यालय हे गुणवान विद्यार्थी घडवणारे संस्कार केंद्र आहे. येथील शिक्षक व प्रशासन हे सतत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी, संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्न करत असतात. विद्यालयातील सर्व विभागांच्या कामाची पाहणी केल्यानंतर खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

## जनता परिवाराचे स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात संपन्न



**मुरूड/प्रतिनिधी :** मुरुड येथील जनता विद्या मंदिर या प्रशालेच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यवसाय अभ्यासक्रम व शिवाजी महाविद्यालय या चारही विभागांचे एकत्रित स्नेहसंमेलन जल्लोष-२०२५ दिनांक २५,२६,२७ डिसेंबर रोजी यशस्वीरित्या पार पडले.

तीन दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलना मधून सर्वच विभागाच्या विद्यार्थ्यांनी अनेक समूह नृत्ये, समूहगीते, नाटिका, एकपात्री प्रयोग,विनोद अभिनय, द्वंद्व गीते,युगल नृत्य, वैयक्तिक नृत्य अशा सर्वच कलाप्रकारांचे अतिशय उत्तम सादरीकरण केले.

या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्रशालेच्या वतीने आयोजित केलेल्या कलांकुर-२०२५ या कला प्रदर्शनी मधून मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल व चित्रकला या सर्वच विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध सुंदर कलाकृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनी मध्ये जवळपास १००० विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती यामध्ये प्रदर्शित केल्या.

यासोबतच दि.२२,२३,२४ डिसेंबर रोजी क्रीडा महोत्सवाचे देखील आयोजन प्रशालेच्या वतीने करण्यात आले. या क्रीडा महोत्सवामधून कबड्डी, खो-खो, धावणे, हॉलीबॉल, बुद्धिबळ, बॅडमिंटन, क्रिकेट अशा विविध क्रीडा स्पर्धा विविध वयोगटा नुसार घेण्यात आल्या.

स्नेहसंमेलनाच्या सुरुवातीस दि.२५ डिसेंबर रोजी संपूर्ण मुरुड शहरामधून प्रशालेच्या ४००० विद्यार्थ्यांची एकत्रित भव्य शोभायात्रा देखील काढण्यात आली. या शोभायात्रेमधून भारतीय संस्कृतीचे सादरीकरण करण्यात आले. २७ डिसेंबर रोजी या स्नेहसंमेलनाच्या समारोप कार्यक्रमासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक श्री शहाजी उमाप हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले... त्यांच्या हस्ते क्रीडा व कला महोत्सवामधील विजेत्या स्पर्धकांना विविध बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अतिशय भव्य दिव्य स्वरूपात झालेल्या या कला व क्रीडा सोहळा पाहण्यासाठी मुरुडकर रसिकांनी खूप मोठ्या प्रमाणात गर्दी केली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी रुरल एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी श्री अमर मोरे यांच्या नेतृत्वात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री डी. व्ही. जाधव, उपप्राचार्य प्रा.श्री दीपक सागावे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री विष्णु पुदाले यांच्यासह प्रशालेच्या सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अतिशय परिश्रम घेतले.

## नववर्षानिमित्त मद्यविक्री कालावधीत शिथिलता

**लातूर/प्रतिनिधी :** नववर्षानिमित्त राज्यातील एफएल-२, एफएल-३, सीएल-३, एफएलबीआर-२ व एफएल-४ व नमुना ई अनुज्ञप्त्यांच्या आस्थापना निर्धारित वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी उघड्या ठेवण्यास राज्य शासनाने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम १३९ (१) (सी) व कलम १४३(२)(एच१)(iv) अन्वये मंजुरी दिली आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या रात्री उशिरापर्यंत उघड्या ठेवण्यास मंजुरी देण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार विदेशी मद्य किरकोळ विक्रीचे दुकान (एफएल-२) आणि बंद बाटलीतून बिअर विक्री (एफएलबीआर-२) आस्थापना सुरु ठेवण्यास ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत शिथिलता देण्यात आली आहे. परवाना कक्ष (एफएल-३) आणि क्लब अनुज्ञप्ती (एफएल-४) यांच्या कालावधीत ३१ डिसेंबर २०२५ रोजी पोलीस आयुक्तालयाच्या परीक्षेत्रासाठी रात्री १.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत आणि पोलीस आयुक्तालय परिक्षेत्राच्या व्यतिरिक्त इतर क्षेत्रासाठी रात्री ११.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत शिथिलता देण्यात आली आहे. तसेच सीएल-३ अनुज्ञप्तीसाठी महापालिका तसेच 'अ' व 'ब' नगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञप्तीसाठी रात्री ११ ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत व इतर ठिकाणी रात्री १० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत शिथिलता देण्यात आली आहे.

## राष्ट्र सेवा दल दिनदर्शिकेचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्र सेवा दलाच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने स्व. पन्नालाल सुराणा यांचे मुखपृष्ठ असलेली २०२६ यावर्षाची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते लातूर येथे करण्यात आले. लातूरच्या दयानंद सभागृहात स्व. मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिदिनानिम्मित आयोजित एका कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी समजवादी नेते सुभाष वारे, डॉ.नागोराव कुंभार, अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. गणेश गोमारे, मजविपचे शिवाजी नरहरे, आणि राष्ट्र सेवा दलाचे लातूंर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कर्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


### वाट ..

ए बी फार्म मिळेना
किती पहायची वाट
वाटाण्याच्या अक्षता
नेहमी लावतात वाट

आयारामाचे कौतुक
फॉर्म वाटपाचा थाट
पक्षांतरकरणा-यांना
आग्रहे पक्कान्ने ताट

स्टारपुत्रा द्या तिकीट
आम्हां नावांवरखाट
क्षणासंपवे कारकीर्द
लावा निष्ठावंता नाट

सोडला न पक्ष कधी
का काढून घेता पाट
हक्काचे देई दुजांना
कामे करून अफाट

लावता वेगळे वळण
सोडूनदिली वहिवाट
पाहवेना पक्षाची बा
पार लागी विल्हेवाट

सरळमार्गी कार्यकर्ते
वाट्या अव घड घाट
सन्मान हो अभिमाने
जे धरतात आड वाट

वेळ जाईलं तसातसा
शांत होई चिवचिवाट
मार्ग तर असे हजारो
नव्याने काढावी वाट

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन एकूण तीन सत्रांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कलागुणांचे प्रदर्शन करून पालकांसह उपस्थित सर्वांची मने जिंकली.

इयत्ता तिसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष प्रकाश कासट , विवेक रेड्डी,शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सूर्यप्रकाश धूत, सुभाष कासले, हुकूमचंद कलंत्री, शांतीलाल कुचेरिया यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अरुण समुद्रे यांनी पालकांनी आपल्या पाल्याच्या विविध गुणांना, शाळेच्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले. शालेय जीवनात विद्यार्थ्याने संपादित केलेले गुण फार काळ टिकत नसतात. पण मुलांमधील कलागुण आयुष्यभर टिकणारे असतात याकडे पालकांनी लक्ष देणे अत्यावश्यक आहे. पालकांसाठी ग्रंथालय सुविधा देणारी ही पहिलीच शाळा आहे. नवोदय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याचे श्रेय पालक शाळेला देतात. हा मुख्यमंत्री आदर्श शाळेच्या पुरस्कारापेक्षा मोठा पुरस्कार असल्याचेही अरुण समुद्रे यांनी सांगितले. यावेळी अभिनव गुणवंत शिक्षक पुरस्काराच्या मानकरी ठरलेल्या श्रीमती सुचिता कदिरे यांचा सन्मानही समुद्रे यांच्या हस्ते करण्यात आला.

बालवाडी ते दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठीच्या दुसऱ्या सत्राच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन डॉ. मुग्धा पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी मुले ही अनुकरणप्रिय असतात. पालक आपल्या कुटुंबियांशी, नातलगांशी कसे वागतात त्याचे अनुकरण करत असतात असे सांगितले. त्याकरिता पालकांच्या वागण्या - बोलण्यात संयम हवा. मुलाला सुरक्षित वाटेल असे वातावरण, विश्वास पालकांनी द्यायला हवा असेही त्या म्हणाल्या. त्याचप्रमाणे त्यांनी पालकांसाठी मोबाईलचा वापर कमी करा, दहा वेळा मुलांचे कौतूक करून एक वेळ रागवण्याचा अधिकार असू द्या, मुलाचे ऐकायचा प्रयत्न करा. शाळेतून आल्यावर सूचना देण्याऐवजी त्याचे १०-१५ मिनिटे म्हणणे ऐका, मुलांना चर्चेची सवय लावा, वर्तन सुधारण्यासाठी त्याला मदत करा, सर्वात महत्त्वाचे अट्टाहासाचा 'च' काढून टाका अशी पंचसूत्री सांगितली.


विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतात मुलांना पंचेंद्रियाचा वापर करायला लावणारे उपक्रम विद्यालयात घेतले जातात, असे सांगितले. विद्यार्थी नैसर्गिक रंग तयार करतात, चित्रे काढतात, पाने ओळखतात, संगीत, क्रीडांमध्ये पुढे येत आहेत, ही बाब भूषणावह असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकांनी त्यांच्यासाठी सुरु केलेल्या ग्रंथालयाचा उपयोग करून घ्यावा. मुलांची कल्पकता विकसित करण्याचा पालकांनीही प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. यावर्षी स्नेहसंमलेनात एकूण १ हजार ३७२ विद्यार्थी सहभागी होणार असल्याचे लक्षात घेऊन तीन सत्रामध्ये स्नेहसंमेलन घेण्याचे नियोजन करण्यात आल्याचे सांगितले. आपल्या विद्यालयातील मुले अभ्यासाबरोबरच क्रीडा, संगीत, चित्रकला क्षेत्रातही अग्रेसर असल्याचा आपल्याला सार्थ अभिमान असल्याचे नमूद करून स्वामी यांनी विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल कायम शंभर टक्के राहत आला आहे. स्नेहसंमेलनात ९० टक्के गीते संगीत विभागाच्या गीतमंचद्वारे सादर होत असल्याचे सांगितले.

संमेलनात विद्यार्थ्यांनी समूह नृत्याबरोबर वैयक्तिक सादरीकरण गायन, नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, कथा-कथन, काव्य - वाचन, अभिवाचन, एकपात्री अभिनय, जादूचे प्रयोग सादर केले. तसेच ऱ्हिदमिक जिमनॅस्टिक, आर्टिस्टिक योगाचे सादरीकरण, पर्यावरणविषयाशी संबंधित कार्यक्रम, सवाल - जबाब सादर केले. निसर्ग वारसा तयार केलेल्या थिमक्का, चिंपांझीवर संशोधन करणा-या जेन गुडॉल, पर्यावरणवादी डेव्हिड टनब्रो यांच्यावरील माहितीपट, माहिती सादर केली.

## श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात परिवहन समितीची बैठक संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २७ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी शालेय परिवहन समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर प्रमुख अतिथी श्रीकृष्ण जयराम पाडे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख अतिथी श्रीकृष्ण जयराम पाडे यांनी विद्यार्थी, पालक व शाळा या तिघांचा समन्वय वाहन चालकांनी ठेवावा, वाहनामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसून घ्यावेत, त्याचबरोबर विद्यार्थी वाहतूक सेवेतील चालकांसाठी शासनाने नवीन योजना राबवावी असे मत व्यक्त केले. यानंतर अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी शासकीय नियमाची पूर्तता करून वेळोवेळी होणारे बदल चालकांनी लक्षात घ्यावेत, विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रवास करावा, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिचय कृष्णा जोशी यांनी केले तर आभार बालासाहेब करपुडे यांनी मानले. या बैठकीस परिवहन समितीचे सर्व सदस्य व वाहन चालक यांची उपस्थिती होती .

### महाराष्ट्र शासन
### सा.बां. विद्युत विभाग धाराशिव
### ई- निविदा सूचना क्रमांक (१७) सन-२०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग धाराशिव (दूरध्वनी क्र. ०२४७२ - २९९४३१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये ५६ कामे समाविष्ट असून या निविदे अंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. उपरोक्त एकत्रीत कामांची निविदा किंमत रुपये १.०० कोटी पेक्षा अधीक आहेत. दहा लाखाच्या आतील किंमतीचे ३२ कामे व १० लाखाच्या वरील किंमतीचे २४ कामे आहेत. त्यापैकी लातूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता ०२ (Recall) कामे राखीव ठेवण्यात आली आहेत

२. या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या. संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

https://mahatenders.gov.in
www.mahapwd.gov.in

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता
सा.बां.विद्युत विभाग, धाराशिव


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६